# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ३०/०४/२०२१

## मा. स्थायी समिती सभा
## सभा सूचना क्र. ०२

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ...........................................................
स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. ०५/०५/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०५/२०२१ सभा सुचना क्र. ०२ विषय पत्रिका

| प्रकरण क्र. | विषय |
|---|---|
| --- | मागील सभांचे इतिवृत्तांत - |
| ०८ | दि. ०५/०३/२०२१, दि. १२/०३/२०२१ व दि. १६/०३/२०२१ (दि. १२/०३/२०२१ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | मध्य/प्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| --- | विनंती अर्ज – निरंक |
| --- | परिवहन व विशेष समित्यांचे ठराव – निरंक |
| --- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज - |
| --- | मध्य/प्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| --- | विनंती अर्ज – निरंक |
| --- | परिवहन व विशेष समित्यांचे ठराव – निरंक |
| --- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज - |
| ०९ | सन २०१८-१९ या वित्तीय वर्षातील, वार्षिक जमा खर्चाचा लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ४६) |
| १० | साप्ताहीक लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ४७) |
| ११ | निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) (मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०२१ रोजीचे प्रकरण क्र.६१ फेरसादर व (मा. स्थायी समिती सभा दि. २२/०२/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ७३ ) |
| १२ | श्री. आरमुगम मणीकम, सफाई कामगार यांचे अपिल अर्जावर निर्णय घेणे. (मा. स्थायी समिती सभा दि. १७/०८/२०२० रोजीचे तहकुब प्रकरण क्र. २७ व मा. स्थायी समिती सभा दि. १२/०२/२०२१ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ५१) |
| १३ | साप्ताहीक लेखापरिक्षण अहवाल सादर करणेबाबत |
| १४ | उत्तन मार्केटमधील जागा भाड्याने देण्यास मान्यता देणेबाबत. |
| १५ | समाज विकास विभाग सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत ०६ काळजीवाहक यांना मुदतवाढ देणेबाबत. |
| १६ | विविध विकास कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| १७ | निविदेस मान्यता देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| १८ | भाईंदर (पूर्व) आरएनपी पार्क, चिंतामणी नाळा (कोळी नगर) येथील धोकादायक शौचालय तोडणे कामास मान्यता देणेबाबत. |
| १९ | मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग) |
| २० | मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| --- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे |
| --- | समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक |

दिनांक :- ३०/०४/२०२१

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईदर महानगरपालिका

**मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय**
स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

जा.क्र.मनपा/मुलेप/06/2021-22

दि. 29/ 04/ 2021

मा. स्थायी समिती सभा दि. 05/05/2021
प्रकरण क्र. 93 कालिन

**प्रति,**
**नगरसचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**विषय :- साप्ताहिक लेखापरीक्षण अहवाल सादर करणेबाबत...**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 105 अन्वये सन 2016-17 व 2017-18 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणातील दि.31/07/2020 पर्यंतचे साप्ताहिक लेखापरीक्षण अहवाल मा.स्थायी समितीच्या पटलावर दि.01/08/2020 रोजी सादर करण्यात आलेले आहे. माहे मार्च 2020 पासुन कोविड-19 या साथीचा रोगाचा प्रसार होत असल्यामूळे महाराष्ट्रात संपुर्ण लॉकडाऊन लावण्यात आला होता तसेच प्रलंबित लेखापरीक्षणाचे काम करण्यासाठी सेवा करार पध्दतीने नेमणुक करण्यात आलेल्या एकुण 7 सेवा निवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांची मुदत मार्च 2020 रोजी संपुष्टात आल्याने दि.01/08/2020 ते 05/01/2021 पर्यंत लेखापरीक्षणाचे काम ठप्प झाले होते. 5 जानेवारी 2021 पासुन 6 सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिका-यांची सेवा करार पध्दतीने नेमणुक करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे त्यापुढील कालावधीची साप्ताहीक लेखापरीक्षण अहवाल खालील गोषवा-यातील नमुद आक्षेप मा.स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहेत.

**साप्ताहिक अहवालाचे आक्षेप खालीलप्रमाणे**

| अ.क्र | सप्ताह | विभागाचे नाव | लेखापरीक्षण वर्ष | आक्षेप क्रमांक | आक्षेप संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | दि.15/01/2021 ते दि.21/01/2021 | आस्थापना विभाग<br>अग्निशमन विभाग | 2016-17<br>2017-18 | 2.18<br>11.1 | 01<br>01 |
| 2 | दि.22/01/2021 ते दि.28/01/2021 | शिक्षण विभाग<br>अग्निशमन विभाग | 2016-17<br>2017-18 | 17.1 ते 17.3<br>11.2 ते 11.3 | 03<br>02 |
| 3 | दि.29/01/2021 ते दि.05/02/2021 | शिक्षण विभाग<br>अग्निशमन विभाग | 2016-17<br>2017-18 | 17.4 ते 17.6<br>11.4 ते 11.5 | 03<br>02 |
| 4 | दि.08/02/2021 ते दि.15/02/2021 | शिक्षण विभाग<br>अग्निशमन विभाग | 2016-17<br>2017-18 | 17.7 ते 17.10<br>11.6 ते 11.7 | 04<br>02 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | दि.16/02/2021 ते<br>दि.22/02/2021 | शिक्षण विभाग<br>अग्निशमन विभाग | 2016-17<br>2017-18 | 17.11 ते 17.14<br>11.8 ते 11.9 | 04<br>02 |
| 6 | दि.23/02/2021 ते<br>दि.02/03/2021 | भांडार विभाग<br>अग्निशमन विभाग | 2016-17<br>2017-18 | 1.7 ते 1.8<br>11.10 ते 11.11 | 02<br>02 |
| 7 | दि.03/03/2021 ते<br>दि.10/03/2021 | पशुसंवर्धन विभाग<br>समाजकल्याण विभाग<br>अग्निशमन विभाग | 2016-17<br>2016-17<br>2017-18 | 18.1<br>19.1<br>11.12 ते 11.13 | 01<br>01<br>02 |
| 8 | दि.12/03/2021 ते<br>दि.22/03/2021 | अग्निशमन विभाग<br>शिक्षण विभाग | 2016-17<br>2017-18 | 9.16 ते 9.20<br>12.1 ते 12.2 | 05<br>02 |
| 9 | दि.23/03/2021 ते<br>दि.31/03/2021 | अग्निशमन विभाग<br>शिक्षण विभाग | 2016-17<br>2017-18 | 9.20 ते 9.25<br>12.3 ते 12.4 | 05<br>02 |
| | | | | **एकुण** | **46** |

२८.०४.२०२१

**(दिग्विजय चव्हाण)**
**मुख्य लेखापरीक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**साप्ताहिक लेखापरीक्षण अहवाल सादर करणेबाबत**
**(कालावधी 15/01/2021 ते 31/03/2021)**

सन 2016-17 या आर्थिक वर्षातील माहे जाने 2021 ते मार्च 2021 या कालावधीचा साप्ताहिक लेखा परीक्षणाचा अहवाल श्री. नितीन पुरो, श्री. मधुकर सुर्वे व श्री. का.वि. संखे लेखापरीक्षण अधिकारी यांच्याकडुन करण्यात आला. तसेच सन 2017-18 या आर्थिक वर्षातील माहे जाने 2021 ते मार्च 2021 या कालावधीचा साप्ताहिक लेखा परीक्षणाचा अहवाल श्री. भागवत भोई व श्री. विजयकुमार कुरणे लेखापरीक्षण अधिकारी यांच्याकडुन करण्यात आला. त्यांनी सादर केलेल्या लेखापरीक्षण अहवालाचे पुनर्विलोकन श्रीम.मंजिरी डिमेलो, उपमुख्यलेखापरीक्षक यांनी केले असुन अहवालाचे अंतिमीकरण श्री.दिग्विजय चव्हाण, महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक यांनी केले आहे.

**लेखापरीक्षणाची कार्यकक्षा**

लेखापरीक्षणाच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार, खर्चाच्या बाबीचे पुर्वलेखापरीक्षण करण्यात येते व जमा रक्कमांचे पश्चात (उत्तर) लेखापरीक्षण करण्यात येते. तसेच साप्ताहीक अहवालातील विभागनिहाय तपशिलवार लेखापरीक्षण करून याबाबतची निरीक्षणे साप्ताहीक लेखापरीक्षण अहवालात नमुद करण्यात आली आहे.

**अस्वीकृती प्रमाणपत्र**

1) प्रस्तुत साप्ताहीक लेखा परीक्षणासाठी विभागाने उपलब्ध करुन दिलेले अभिलेखे व माहितीच्या आधारे सदर साप्ताहीक अहवालात नमुद केलेले आक्षेप नोंदविण्यात आलेले आहे.
2) प्रस्तुत साप्ताहीक लेखापरीक्षण अहवाल जे लेखे व माहिती लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आली त्या आधारे तयार करण्यात आला असुन जे लेखे व माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही त्या संदर्भातील अनियमितता/ त्रुटी / अपहार/ अफरातफर व अन्य तत्सम गैर बाबीस लेखापरीक्षण विभाग जबाबदार असणार नाही.

२९.०४.२०२१

(दिग्विजय चव्हाण)
मुख्य लेखापरीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# आस्थापना विभाग

**परिच्छेद क्र. 2.18 <u>अनुज्ञेय नसताना कुटुंब निवृत्तीवेतनाचे प्रदान केलेबाबत</u>.....**

श्री. जयराम वेल्यन, सफाई कामगार पदावर असतांना दि.12/02/2008 रोजी मयत झाले असून त्यांची पत्नी श्रीमती भारतमणी 15/02/2008 रोजी मयत झाल्या आहेत. त्यांच्या पश्चात वारस त्यांचा एक मुलगा कु.विजयन जयराम वेल्यन असून त्याची जन्मतारीख दि.26/09/1992 अशी आहे. कर्मचा-याच्या निधनानंतर देय होणारे कुटूंब निवृत्ती वेतन त्यांचा वारस मुलगा कु.विजयन यांना मंजूर करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी अभिप्राय खालीलप्रमाणे -

1. महाराष्ट्र्र नागरी सेवा नियम (निवृत्तीवेतन) 1982 मधील नियम 116(5)(दोन)मधील तरतूदीनुसार कुटूंब निवृत्ती वेतन धारक मयत कर्मचा-याचा मुलगा असेल तर त्याला वयाच्या 21 वर्षापर्यंत कुटूंब निवृत्ती वेतन अनुज्ञेय आहे. सदर प्रकरणी कुटूंब निवृत्ती वेतन धारक (मयत कर्मचा-याचा मुलगा) कु.विजयन याची जन्मतारीख दि.26/09/1992 अशी असून त्याला दि.25/09/2013 रोजी वयाची 21 वर्षे पूर्ण झालेली आहेत. सबब संदर्भीय तरतूदीनुसार दि.26/09/2013 पासून श्री.विजयन (मयत कर्मचा-याचा मुलगा) यांना कुटूंब निवृत्ती वेतनाचे प्रदान अनुज्ञेय नाही. तथापि कै.जयरामन वेल्यन /श्रीम.विजयन जयरामन वेल्यन वारस पत्नी या नावाने कुटूंब निवृत्ती वेतनाचे प्रदान अदयाप होत असल्याचे अभिलेखावरून निदर्शनास आले आहे. सदर प्रकरणी अर्धसमास क्रमांक 14/03-02-2021 अन्वये खुलासा मागविण्यांत आला असून खुलासा अप्राप्त आहे.

प्रकरणी माहे फेब्रूवारी,2021 पासून निवृत्ती वेतन बंद करण्यांत आलेले असून दि.25/02/2013 ते माहे जानेवारी,2021 दरम्यानच्या कालावधीमध्ये नियमबाहय अदा केलेली निवृत्ती वेतनाची **रक्कम रु 5,96,970.72** वसुलीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशाप्रकारे इतर प्रकरणे आहेत का ? याबाबत आस्थापना विभागाने तपासणी करुन अनुपालन सादर करावे.

**( वसुलपात्र रक्कम रू. 5,96,970.72)**

# शिक्षण विभाग

**परिच्छेद क्र. 17.1:- वेतन अनुदान नोंद वही बाबत...**

मिरा भाईंदर महानगर पालिकेच्या शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक प्रवर्गाच्या वेतनासाठी 50% अनुदान रक्कम शासनाकडुन 50% अनुदान रक्कम महानगरपालिकेमार्फत वितरीत केली जाते

वित्त वर्ष 2016-17 हया आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणात शासना कडुन वेतनाकरीता रक्कम रु.7,75,62040/- इतके अनुदान प्राप्त झालेले आहे. या बाबत खालील अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 62,315,317,450 अन्वये नमुना नंबर 26 मध्ये अनुदान नोंदवही ठेवण्यात आलेली नसल्याने प्राप्त झालेली अनुदानातील रक्कम ही 50% वेतन अनुदानाची असल्याबाबत व सदर रक्कम वित्त वर्ष 2016-17 हया आर्थिक वर्षाच्या मागणी प्रमाणेच असल्याची पडताळणी करता आलेली नाही

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 317 अन्वये अनुदान मंजूरी आदेश / वित्त् प्रेषण आदेश लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नसल्याने अनुदान जमा रक्कम व मंजूरी आदेश (वित्त् प्रेषण) प्रमाणे मंजूरी रक्कम हया बाबत ताळमेळ घेता आलेला नाही.

**परिच्छेद क्र. 17.2, भाविष्य निर्वाह निधी अभिलेख मधिल अनियमित्ता**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण खात्याच्या शिक्षक प्रवर्गाच्या भविष्य निधी लेख्यासाठी महाराष्ट्र सर्वसामान्य भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 6(1) अन्वये वर्गणीदाराचे लेखे प्रत्येक वर्गणी दाराच्या नावे खाते उघडुन नियम 12 प्रमाणे त्यावरील व्याज रक्कमेची परिगणना करुन लेजर अकांऊट प्रत्येक वर्षाच्या मार्च अखेर लेखे परिपूर्ण करणे आवश्यक असताना बहुतांश लेख्यांची परिपूर्ण नोंदी घेतलेल्या नाहीत त्यामुळे व्याजाची परिगणना जमा रक्कम हया बाबत पडताळणी करता आलेली नाही.

2. अभिलेखे परिपूर्ण करण्यासंदर्भात महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 466(5) परिशिष्ट - 5 अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि यानुसार कार्यवाही करण्यांत येत नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे.

3. बृहत पत्राप्रमाणे एकूण 31 मार्च 2017 अखेर जमा/खर्चाचा लेखा अदयावत करण्यांत आलेला नाही. त्यामुळे बँक खाते आणि रोखवहीप्रमाणे 31 मार्च 2017 अखेर जमा/खर्च रकमांचा ताळमेळ घेता आलेला नाही. सबब बृहत पत्राप्रमाणे अखेरीची शिल्लक व प्रत्यक्ष शिल्लक रक्कमेत किती रक्कमेची तफावत आहे. या बाबतची खातरजमा लेखापरीक्षणात करता आली नाही.

उपरोक्ता नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येवून पूर्तता अहवाल सादर करण्यांत यावा.

**परिच्छेद क्र. 17.3:- भविष्य निर्वाह निधी वर्गणीदाराला वार्षिक हिशोबाचे विवरण पत्रक देणे बाबतची अनियमितता**

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील (1) नियम 36(1) नुसार प्रत्येक वर्षाच्या 31 मार्च अखेरीस प्रत्येक भविष्य निर्वाह निधीच्या खातेदारास त्याच्या निधीचे लेख्याचे विवरण पत्र देणे बंधनकारक आहें. तसेच महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 466(5) परिशिष्ट 5 ख प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे तथपि अशी कार्यवाही मिरा भाईंदर महानगरपलिकेच्या शिक्षण विभागाकडुन अंमलात आणली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

2. भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 36(1) प्रमाणे खातेदारास भविष्य निर्वाह निधीचे विवरणपत्र दिलेले नाही. नियम 1998/36 (2) मधील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधीचे विवरणपत्र प्राप्ता झाल्यापासून तीन महिन्यात विसंगतीबाबत खातेदाराने कळविणेचे आहे. मात्र भविष्य निर्वाह निधीचे विवरणपत्र न दिल्यामुळे कर्मचा-यांना त्यांनी वर्षभरात भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा केलेली व प्रत्यक्ष लेख्यामध्ये दर्शविलेल्या जमा/खर्च रकमांचा ताळमेळ घेणे शक्य झालेले नाही.

तरी सर्व शिक्षण प्रवर्गाचे भविष्य निर्वाह निधिचे लेखे(लेजर अकाऊंट) पूर्ण करुन व्याजाची रक्कम परिगणित करुन पूर्तता दर्शवावी. तसेच सर्व कर्मचा-यांना प्रति वर्षी मार्च अखेरचे विवरणपत्र 31 मे पूर्वी देण्यांत येईल याची दक्षता घेण्यांत यावी.

**आक्षेप क्र.17.4:- थकीत शाळा गृह भाडे बाबत...**

शासन परिपत्रक क्र. प्रा.शा.भा.मंत्रालय दि. 21/01/2001 नुसार मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम 1947 मधील नियम 15 (अ) (3) अन्वये नगरपालिका शिक्षण मंडळाने प्राथमिक शिक्षणाकरीता भाडयाने घेतलेल्या इमारतीचे भाडे पोटी 50% अनुदान रक्कम अनुज्ञेय आहे. त्यानुसार सदर भाडे रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थाना देय आहे.

कार्यकारी अभियंता सार्व. बांधकाम विभाग ठाणे यांचे प्रमाणपत्रान्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील 17 म. न.पा. शाळेच्या इमारतीचे भाडे 50% अनुदान रक्कमप्रमाणे 19,34,136/- शाळा गृह भाडयांस शासना कडुन मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार शि.उ.स/प्राथ/प्रशिम/अनु/08-09/42336/43 दि. 14/11/2006 अन्वये 1993-94 ते 1997-98 पर्यतच्या 5 वर्ष कालावधी करिता इमारत भाडे 50% अनुदान रक्कमप्रमाणे 87,91,380/- इतकी रक्कम भाडे पोटी प्राप्त झालेली आहे. तसेच 1998-99 ते 03/04 पर्यंत 50% अनुदान रक्कम प्रमाणे 1,05,49,956/- भाडे रक्कम शासनाकडुन प्राप्त झालेली आहे.

वित्त वर्ष 2004-05 ते 2015-16 हया 13 वर्षाचे शाळागृह भाडे रक्कम 50% प्रमाणे 2,28,57,288 /- इतकी रक्कम शाळागृह भाडे पोटी थकीत आहे. तरी सदर थकीतभाडे रक्कम शासनाकडुन मागणी करुन पूर्तता दर्शवावी

मागणी क्र. ई. - 2 लेखाशिर्षा 22002 सर्व साधारण शिक्षण

01 प्राथमिक शिक्षण

103 प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थाता अर्थसहाय्य्

03 इतर स्थानिक संस्थाना अनुदाने

(2202028) 31

**शासनाकडून थकित भाडे अनुदान रक्कम - 2,28,57,288/-**

**मत्ता - 2,28,57288**

**आक्षेप क्र. 17.5:- सेवा पुस्तक नोंदी व दुय्यम सेवा पुस्तक बाबत**

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981 च्या नियम 36 अन्वये सेवा पुस्तक अभिलेख अदयावत ठेवण्यात येवून सदर सेवा पुस्तकांची दुय्यम प्रत कर्मचा-यास घ्यावी अशी तरतुद आहे. तथापि शिक्षक प्रवर्गाची सेवा पुस्तके अभिलेख अदयावत नसल्याचे व त्यांना सेवा पुस्तकांची दुय्यम प्रत दिली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 चे नियम 25 ते 49 मधील तरतूदीचे काटेकोर पालन करुन पूर्तता दर्शवावी

**परिच्छेद क्र. 17.6:- आयकर रक्कम शासन भरणा बाबतचे चलन लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्या बाबत**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत शिक्षण विभागातील 181 शिक्षक पदाच्या प्रवर्गाच्या माहे फ्रेबु. 2017 अदा माहे. मार्च 2017 च्या वेतनातुन आयकर कायदा 1961 मधील TDS संदर्भित तरतुद कलम 192 नुसार वेतनातून कपात केलेली आयकर रक्कम 72,80241/- धनादेश क्र. 722006 दि. 08-03-2017 नुसार SBI खाती वटलेला असल्याचे बँक पासबुक नुसार दिसून येते. तथापि हया बाबतचे चलन लेखापरिक्षणास पडताळणी साठी उपलब्ध झालेले नाही. तसेच सदरची रक्कम कोषागार कार्यालयाने महालेखाकार कार्यालयाकडे लेखे सादर करतांना आयकर विभागाच्या जमेच्या लेखाशिर्षाखाली जमा करण्यांत आली असल्याबाबत कोषागार ताळमेळ घेण्यांत आलेला नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे. यामुळे आयकराची रक्कम शासनाच्या लेख्यामध्ये प्रत्यक्ष जमा झाली किंवा कसे? हया बाबतची खातरजमा करता आली नाही. सदर प्रकरणी अर्थसमास पत्र क्र. 179 दिनांक 09-02-2021 नुसार खुलासा मागण्यात येवूनदेखील हया बाबतची माहिती लेखापरिक्षणास अवगत करण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्र. 17.7:- जादा प्रदान वेतनाबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत शिक्षण विभागातील शिक्षक हया पदावरील कार्यरत शिक्षकांचे माहे. मे. 2016 (प्रत्यक्ष  वेतन अदा जुन 2016) करिता 864000/- रु. रक्कमेचे देय्यक पारित केलेले आहे. त्या बाबतची अनियमियता खालील प्रमाणे आहे.

1. शिक्षण विभागातील शिक्षण प्रवर्ग दिर्घ सुट्टी रजा नियम म.ना.से  (रजा) नियम 1981 अन्वये दिर्घ सुट्टी हया प्रकारात समावेश होतो .मे. माहिन्यात पूर्णत: शाळा  31  दिवस बंद असल्याने शिक्षक या प्रवर्गाच्या पदाला माहे. मे महिन्याच्या वेतनात प्रवास भत्ता रक्कम शाळा बंद असल्याने देय नसतो असे असताना त्यांना नियमाबाहय पणे वेतनात प्रवास भत्ता रक्कम रु. 86,400/-  अदा केलेली आहे. सदरची रक्कम लेखापरिक्षणांस मान्य करता येत नाही.

2.  86,400 /- वेतन रक्कम पैकी 50% रक्कम शासन अनुदान व 50% रक्कम महानगर पालिका अनुदान नुसार अनुक्रमे 43,200/- शासन अनुदान सदर रक्कम कायम स्वरुपी अमान्य ~~असामान्य~~ करण्यात येत असून सदर रक्कम संबधितांनाकडुन वसुल करुन शासन जमा करुन पूर्तता दर्शवावी.

3. 86,400 /- वेतन रक्कम पैकी 50% अनुदान रक्कम महानगरपालिका खर्च रक्कम 43200/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत असून सदर रक्कम संबधिताकडुन महानगरपालिकेच्या निधीत जमा करुन पूर्तता दर्शवावी.

एकुण वसुल पात्र रक्कम (43200+43200)86400/-

**परिच्छेद क्र.17.8:- जादा अनुदान रक्कम जमा बाबत....**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत शिक्षण विभागाच्या शिक्षक हया प्रवर्गाच्या कार्यरत पदाच्या वेतनापोटी अनुदान व सेवा निवृत्ती वेतन अनुदान / कुटुंब निवृत्ती वेतन अनुदान करिता 50% रक्कम वेतन अनुदान रक्कम शासनाकडुन मागणीनुसार देय आहे. त्यानुसार 2016-17 करिता खालील प्रमाणे वेतनाच्या 50% अनुदान रक्कम मागणी केलेली आहे.

वर्ष 2016-17 मागणी अनुदान रक्कम

1. मंजूर पदानिहाय कार्यरत पदांच्या वेतना करिता 50% वेतन अनुदान रक्कम 59,32,359/-

2. सेवा निवृत्ती वेतन कुंटूंब निवृत्ती वेतनाकरिता 50% वेतन अनुदान रक्कम 1,58,03,837/-

अशी एकूण 7,51,26,896/- इतकी रक्कम 50% वेतन अनुदानकरिता मागणी केलेली आहे. तथापि वित्त वर्ष 2016-17 करिता शासनाकडुन 7,75,62,040/- इतकी रक्कम वेतन अनुदान म्हणुन प्राप्त झालेली आहे. त्यानुसार जादा प्राप्त अनुदान रक्कम 24,36,144/- बाबत खुलासा करावा अन्यथा सदर रक्कम शासन जमा करुन पूर्तता दर्शवावी. 2016-17 या वर्षात शासनाकडून प्राप्ता झालेल्या अनुदानाचे मार्च,2017 अखेर प्रत्यक्ष खर्चाचे तपशिलासह उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे आवश्यक आहे. तथापि सदरचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे.

**परिच्छेद क्र.17.9, ताळमेळ बाबत..**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील वेतन अनुदान कॅश बुक नोंद नुसार दि. 31/03/2017 अखेर 27,25,359/- इतकी रक्कम शिल्लक दिसून येते व दि. 31/03/2017 अखेर बँक पास बुक नुसार 50,32,012/- इतकी रक्कम शिल्लक दिसून येते.प्रत्यक्ष फरक रक्कम रु. 23,09,653/- इतकी जादा रक्कम बँक खाती दिसून येते तथापि 31/03/2017 अखरे खर्च प्रमाणकानुसार खालील धनादेश 31/03/2017 नंतर प्रत्यक्ष बँक खात्यामधून वटवलेले आहेत

| अनु. क्र. | धनादेश क्रमांक | रककम |
|---|---|---|
| 1 | 722014 | 3,42,760 |
| 2 | 722013 | 10,24,520 |
| 3 | 722009 | 9,35,423 |
| 4 | 721993 | 6,990 |
| | एकूण | 23,09,693 |

त्यानुसार निव्वळ फरक रक्कम रु 40/- बँक खाती कॅशबूक जमा रक्कमेपेक्षा कमी दिसून येतात तरी याबाबत पूर्तता दर्शवावी.

**परिच्छेद क्र. 17.10, जमा रक्कमे बाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत शिक्षण विभागाचे वित्त वर्ष - 2016-17 करिता निवडक माहिन्यांचे पडताळणी केली असता दि. 26/07/2016 रोजी रक्कम रु 23,0000/- व दिनांक 26-06-2016 रोजी रक्कम रु 37,396/- प्राप्त झालेली असुन त्यांची नोंद कॅश बुकात घेण्यात आलेली आहे. हया बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 75 अन्वये प्राप्त झालेल्या सर्व रक्कमेची पावतीने पोच देणे आवश्यक आहे त्यानुसार अर्धसमास पत्र क्र. 190 दिनांक 24/02/2021 अन्वये पडताळणी साठी पावतीची मागणी करुनही लेखापरिक्षणास पावती उपलब्ध करुन दिलेली नसल्याने जमा रक्कमे बाबत पडताळणी करता आलेली नाही.

2. सदर रक्कम जमा बाबतचे आदेश तसेच जमा रक्कमेचे स्वरूप (रोख / धनाकर्ष /धनादेश) हया बाबतची माहती वरील नमुद अर्धसमास पत्राव्दारे मागणी करुनही माहिती अप्राप्त असल्याने पडताळणी करता आलेली नाही.

3. जमा रक्कम बाबत महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2011 नियम 84 अन्वये दिवसाअखेर पूर्वी जमा रक्कमेचे प्राधिकृत अधिकाऱ्याकडुन चलन तयार करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

**परिच्छेद क्र. 17.11, व्यवसाय कर रक्कम शासन भरण न केल्याबाबत**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत शिक्षण विभागाचे शिक्षक हया प्रवर्गाचे वित्त वर्ष 2016-17 मधील निवडक माहिन्याचे वेतन देयक आणि वेतनपट नोंदवहीची पडताळणी केली असता असे निर्देशनास येते की, एकूण वेतनन रक्कमेतून शासकीय कपाती नुसार व्यवसाय कर रक्कम वजाती केलेली आहे तथापि सदर रक्कम शासन भरणा केलेली दिसून येत नाही तरी रू. 7,02,500/- रक्कम व्यवसाय कर लेखाशिर्षाखाली भरणा करुन लेखापरिषणास चलन व कोषागर ताळमेळ सह पूर्तता दर्शवावी. प्रति कर्मचारी 2500/- रु. वार्षिक प्रमाणे 281 पदांकरिता कपात करण्यात आलेली व्यवसाय कर रककम पुढिलप्रमाणे कपात करण्यात आलेली व्यवसाय कर रक्कम परिगणना खालील प्रमाणे आहे.

**2500रु. X 281 पदे = 7,02,500/-**

**शासन भरणा करावयाची रक्कम रु. 7,02,500/-**

**परिच्छेद क्र.17.12:- प्रयोग शाळा तपासणी शुल्क अदा बाबत...**

मिरा भाईंदर पालिका शिक्षण विभागामार्फत वित्त वर्षा 2016-2017 मध्ये विद्यार्थाकरिता गणवेश व दफ्तर /वॉटर बॅग या साहित्याचे नमुने खालील नमूद केलेल्या प्रयोग शाळेत पाठविण्यात आलेले होते. त्या तपासणी शुल्काची देयकाची रक्कम शिक्षण विभागाने अदा केलेली आहे. सदर देयकातील अनियमिकता बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

| अनु क्र. | प्रमाण क्र. | दिनांक | धनादेश | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| 1. | -- | 03-08-2016 | 967086 | 20240 | संचालक व्ही.जे. आय.टी कॉलेज लॅब, मुंबई (शालेय दफ्तर / वॉटर बॅग तपासणी शुल्क ) |
| 2. | -- | 05-10-2016 | 967093 | 199295 | शिवमल्हार टेक प्रोव्ह.लि. प्रयोग शाळा नागपूर (गणवेश नमुने तपासणी अहवाल ) |
| | | | **एकूण रक्कम** | **2,19,532/-** | |

1. सदर देयक कोणत्या निधिच्या तरतुदी मधून अदा केलेला आहे. हया बाबतचे खर्च मंजुरी आदेश लेखपरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

2. सदरच्या देयकातुन शासकीय कपातींची वजावटी करुन शासन भरणा केल्याचे दिसून येत नाही.

3. शिक्षण विभागातुन देयक पारित करुन त्यांच्या कडील खात्यामधून देय्यक रक्कम अदा केलेली आहे हया बाबतचे प्राधिकार लेखा पारिक्षणास प्राप्त करुन देण्यात आलेले नाहीत हया बाबतची पूर्तता बाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 190 दि.24/02/2021 नुसार खुलासा मागवूनही माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.सबब सदरील खर्च रक्कम बाबत पडताळणी करता आलेली नाही

**परिच्छेद क्र. 17.13, जमा रकमांच्या तपशिलाची कॅश बूकामध्ये नोंद न केल्याबाबत ...**

मिरा भाईंदर महानगरपालिका अतंर्गत शिक्षण खात्याचे वित्त वर्ष 2016-2017 हया आर्थिक वर्षाचे शिक्षण् विभागातील निवडक माहिन्यातील कॅश बुकाप्रमाणे जमा नोंदीची तपासणी केली असता खालील नमूद जमा रक्कमेबाबत तपशिल नोंदविण्यात आलेला नाही. तसेच सदर रक्कमेस महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता - 2011 मधील नियम 75 अन्वये नमुना 54 नुसार पोच पावती दिल्याबाबत व नियम 84 प्रमाणे नमुना नं. 56 प्रमाणे भरणा चलन लेखापरिक्षणात उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. सबब सदरच्या रक्कमा कोणत्या लेखाशिर्षाखाली जमा केल्याबाबत लेखापरिक्षणास खातरजमा करता आलेली नाही. या बाबत अर्धसामासिक ज्ञापन क्र. 190 दि. 24/02/2021 नुसार मागणी करुनही अभिलेख उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

**परिच्छेद क्र. 17.14, जमा रकमेच्या तपशिला बाबत कॅश बुकात नोंद न केल्याबाबत..**

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागाचे वित्त वर्ष 2016-2017 हया आर्थिक वर्षाचे शिक्षण विभागातील कॅश बूकाची निवडक महिन्याची पडताळणी केली असता खालील जमा रकमेबाबत तपशिल नोदविण्यात आलेला नाही. तसेच सदर रक्कम पावती क्रमांकाने / चलनाव्दारे जमा केली त्याच प्रमाणे सदर रक्कम कोणत्या स्वरुपात (उदा. रोख/ धानदेश/धनाकर्ष) व्दारे प्राप्त झाली या बाबतच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत हया बाबत अर्थसमासिक पत्र क्र. 190 दि. 24/02/2021 व्दारे माहिती मागवुन ही लेखापरिक्षणास माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे या बाबत पडताळणी करुन खात्री करता आलेली नाही.

जमा रकमेचा तपशिल खालील प्रमाणे

| **अनु क्र.** | **दिनांक** | **जमा रक्कम** | **तपशिल** |
|---|---|---|---|
| **1.** | 26-02-2016 | 2,30,000/- | नोंद नाही. |
| **2.** | 26-02-2016 | 37396/- | नोंद नाही. |
| | **एकूण** | **2,67,396/-** | |

हया बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 75 अन्वये नमुना नं. 54 मध्ये जमा रकमेची पावती देणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासहिता 2011 मधील नियम 84 प्रमाणे नमुना नं.56 प्रमाणे प्राधिकृत अधिका-या मार्फत जमा केलेल्या रकमेचे भरणा चलन लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही. त्यामुळे सदर रक्कम कोणत्या लेखाशिर्ष खाली जमा आहेत हयाबाबत लेखापरिक्षणास खातरजमा करता आलेली नाही.

# भांडार विभाग

**परिच्छेद क्र. 1.7, घरपट्टी कराची / पाणी पट्टी कराची कोरी पावती पुस्तके रद्द केल्याबाबत...**

वित्त वर्ष 2016-2017 करिता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भांडार विभागाचे लेखापरिक्षणात खालील नमुद केलेले कोरे पावती पुस्तके रद्द केलेली आहेत. हया बाबतचे तपशित खालील प्रमाणे

| अनु क्र. | पावतीपुस्तक विवरण | पावती पुस्तक क्रमांक | एकूण पावती पुस्तक संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | घरपट्टी कराची वसुली पावती पुस्तके | 14 ते 20 | 7 नग | नोंदवही क्र 91 पृष्ठ क्र. 1 वरील नोंदीनुसार रद्द केलेले आहे. |
| 2 | पाणी पट्टी कराची पावती पुस्तके | 2850 ते 2900 | 51 नग | नोंदवही क्र 91 पृष्ठ क्र. 5 नुसार पेन्सीलीने शेरा मारुन पावती पुस्तके रद्द केलेली आहेत. |
| 3 | पाणी पट्टी कराची पावती पुस्तके | 2254 ते 2600 | | नोंदवही क्र 91 पृष्ठ क्र. 7 नुसार पेन्सील नोंदीनुसार रद्द केलेली आहेत. |

हया बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत

1. महाराष्ट्र नगरपारिषद लेखासंहिता 2011 नियम 268 अन्वये प्रातिकृत अधिकारी सुस्थितीत असलेल्या तथापि कालबाहय झालेल्या / खराब झालेल्या किंवा सुस्थितीत नसलेल्या अथवा ज्यांची मागणी अत्यल्प आहे. किंवा ज्याची मागणी अजिबात नाही. अशा वस्तुंची वेळोवेळी पडताळणी करुन प्रत्येक तिमाहीतुन किमान एकदा अशा वस्तुंबाबत काय कार्यवाही करावी या बाबतचा निर्णय या कामासाठी स्थापना केलेल्या समिती मार्फत घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न करता सदर कोरे पावती पुस्तके रद्द करण्यात आलेली आहेत.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 272 प्रमाणे अशा बाबीचे मुल्यांकनाचे समायोजन भांडार अधिकारी यांनी ~~मुख्याधिकाऱ्याकडून~~ सक्षम अधिकाऱ्याकडून येथोचित असताना अशी कार्यवाही न करता कोरे पावती पुस्तके नियम बाहय पणे रद्द केलेली आहेत.

3. सदर घरपट्टी कराची / पाणीपट्टी कराची कोरे पावती पुस्तके रद्द का केली? या बाबतचे कारण नमूद केलेले नाही.

**परिच्छेद क्र. 1.8, भांडार विभागातील कार्यपध्दती मधील अनियमितता**

वित्त वर्ष 2016-2017 हया कालवधीच्या लेखापरिक्षणात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भांडार विभागाची पडताळणी केली असता खालील नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा वापर केलेला नसल्याचे निर्देशनास येते

भांडार विभागाच्या कार्यपध्दतीसाठी महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 चे नियम 251 ते 274 प्रमाणे कार्य पध्दतीचा अवलंब करुन अभिलेखे नोदी ठेवणे आवश्यक आहे.

| अनु क्र. | नियम | तपशिल |
|---|---|---|
| 1. | 251 | खरेदी आदेशासह / मागणी पत्रानुसार प्राप्त वस्तुंचे चलन नुसार वितरण करणे. |
| 2. | 253 | नमुना नंबर 70 मध्ये साहित्य पावती नोंद घेणे. |
| 3. | 254 | मागणीपत्र सादर करणे. |
| 4. | 257 | साहित्य प्रदान शिफारस |
| 5. | 259 | भांडार पुरवठा आदेश नमुना नं. 72 मध्ये भांडार अधिका-यांनी देणे आवयश्क आहे. |
| 6. | 264 | साहित्य मागणी एक पत्र भांडारात ठेवणे. |
| 7. | 266 | नोंदवही प्रमाणे वस्तुसूचि प्रमाणित करणे. |
| 8. | 268 | कालबाहय / खराब वस्तुसूचि तयार करणे . |
| 9. | 270 | नमुना नंबर 64 मध्ये साहित्य मागणी करणे . |
| 10. | 274 | वर्षाच्या शेवटी नमुना नं. 73 मध्ये शिल्लक मालाचा / वस्तुंचा अहवाल पाठविणे. |

तरी या पुढे भांडार विभागात उल्लेखनिय नियमाप्रमाणे उचित नमुना नंबर मध्ये अभिलेखे ठेवण्याची दक्षता घेण्यात यावी.

# पशुसंवर्धन विभाग

**परिच्छेद क्र.18.1:- भटक्या कुत्राच्या निर्बिजिकरण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण योजनेच्या थकित अनुदानाबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपलिका पशुसवंर्धन विभामातील वित्त वर्ष 2016-2017 हया वित्त वर्षात 1033 श्वानांवर निर्बिजिकरण शस्त्रक्रिया व रेबीज प्रतिबंधात्मक लसीकरण केलेले आहे.

ॲनिमल वेंल्फेर बोर्ड ऑफ इंडिया पर्यावरण व वन मंत्रालय भारत सरकार कडुन भटक्या कुत्रयांच्या जन्म नियंत्रण व रेबीज प्रतिबंधक लसीकरण योजनेकरिता 50 % लक्षांकासाठी प्रति भटक्या श्वानांना पकडणे करिता 75/- रु व निर्विजीकरण शस्त्रक्रिया / औषधउपचार / लसीकरण करिता प्रति श्वान 370 रु. असे एकूण प्रतिश्वान 445/- रु अनुदान दिले जाते.

वित्त वर्ष 2016-2017 करिता 1033 भटक्या श्वानांवर सदर योजने अंतर्गत निर्बिजिकरण शस्त्रक्रिया व लसीकरण केलेले आहे. त्यानुसार योजनेच्या मार्गदर्शन तत्वानुसार 50% लक्षांक उपचार 517 भटक्या श्वानांच्या करिता 445/- रु प्रति श्वान प्रमाणे 2,30065/- अनुदान रक्कम महानगरपालिकेस केंद्र शासनाकडुन प्राप्त होणे गरजेचे आहे. तथापि अजून पर्यंत सदर अनुदनित रक्कम महानगर पालिकेस प्राप्त झालेली नाही.

तरी सदर अनुदानीत रक्कम प्राप्त करुन घेणे करिता संबधित विभागाने पाठपुरावा करुन थकित अनुदानीत रक्कम प्राप्त करुन लेखापरिक्षणास अनुपालन दर्शवावे.

**थकित अनुदानित रक्कम 2,30065 /-**

**मत्ता 2,30065 /-**

# समाजकल्याण विभाग

**परिच्छेद क्र.19.1:-क्रिडा विभागाचे अभिलेख लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नसलेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका महासभा दि.01/07/2015 ठराव क्र.14 प्रकरण क्र.35 नुसार बांधण्यात आलेल्या क्रिडा संकुल इमारतीचा वापर सुरु करण्याबाबत निश्चिती करण्यात आलेले आहेत. त्यानुसार वित्त वर्ष -2016-17 करीता खालील बाबनिहाय किती महसुल प्राप्त झाला याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.178 दि.02/02/2021 अन्वये लेखापरीक्षणा करीता माहीती मागविण्यात आलेली होती. तथापि याबाबतचे अनुषंगाने अभिलेख लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने प्राप्त महसुलाबाबत पडताळणी करता आलेली नाही.

**महसुल जमा बाबतचे बाबनिहाय तपशिल पुढीलप्रमाणे**

| अ.क्र | बाब |
|---|---|
| 1 | मोकळी जागा |
| 2 | जलतरण तलाव |
| 3 | बॅडमिंटन हॉल |
| 4 | विविध क्रिडा सुविधा |
| 5 | व्यायाम शाळा |

# अग्निशमन विभाग

**परिच्छेद .क्र. 9.16, अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत..**

मौजे-नवघर, स.क्र. 191/11,12,14,4, 190/5, 7 (नविन), 223/11,12,14,4, 222/5 (जूना)

शैक्षणिक इमारत बांधकाम - एस.के.इंग्लिश स्कुल (तळ + 7), बांधकाम क्षेत्र - 10369 चौ.मी.

अंतिम ना-हरकत दाखला - 10369 चौ.मी. पैकी 463.96 चौ.मी (तळ+3 मजले) क्र. MBMC/FIRE/472/2016-

17, दि. 03/09/2016

**अभिप्राय :-**

उपरोक्त प्रकरणी निर्गमित केलेल्या अंतिम ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 असून सदर दाखल्याचे दि. 01/01/2017 रोजी नूतनिकरण करणे आवश्यक आहे. तथापी, नस्तीचे अवलोकन केले असता, दाखल्याचे नुतनिकरण केले नसल्याचे आढळून आले आहे. अर्धसमास ज्ञापन क्र. 167, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे.

तरी नुतनिकरण आणि तपासणी शुल्क एकुण रक्कम रु. 4928/- संबंधीतांकडून वसूल करुन दाखविल्याचे नुतनिकरणाची कार्यवाही करण्यांत यावी.

कॅपिटेशन शुल्क - 463.96 X 33 = 15.311/-

i) तपासणी शुल्क - कॅपिटेशन शुल्क रु. 15311 X 25% = 3828/-

ii) नुतनिकरण शुल्क = 1100/-

4928/-

## परिच्छेद .क्र. 9.17:- कॅपिटेशन फि आकारणी/वसूली मधील अनियमितता.

मौजे-नवघर, सिटी सर्व्हे नं. 120/2, 3 (नविन), 416/2, 3 (जूना)

निवासी ईमारत, बी-विंग, (स्टील्ट + 15 मजले)

वास्तू विशारद - मे. डी. एन. पटेल ॲण्ड असोशिएट्स

प्रोव्हिजनल ना-हरकत दाखला क्र. NOC/MBMC/FIRE/234/2016-17, दि. 08/07/2016

ईमारतीचा क्षेत्रफळाचा तपशिल - (ईमारतीची उंची 46.75 मीटर)

| ईमारत प्रकर | बांधकाम क्षेत्र | Refuge क्षेत्र | बाल्कनी क्षेत्र | स्टेअट्केस क्षेत्र | C.B. क्षेत्र | स्टील्ट क्षेत्र | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्टील्ट + 15 विंग-बी | 2854.25 चौ.मी. | 51.18 चौ.मी. | 271.48 चौ.मी. | 723.20 चौ.मी. | 110.88 चौ.मी. | 195.06 चौ.मी. | 4206.04 चौ.मी. |

कॅपिटेशन फि - 4206.04 X 150 प्र.चौ.मी. = रु. 6,30,906/-

वसूलीचा तपशिल - 1)रु. 4,73,110/- Prov. NOC चे वेळी भरणा

2 रु. 40,100/-

3) रु.1,17,696/- - पावती क्र. 817856/07/07/2016

रु. 6,30,906/-

**अभिप्राय :-**

उपरोक्त नमुद इमारतीची कॅपिटेशन फि रक्कम रु. 630906/- तीन टप्प्यात भरणा केलेली आहे. पैकी रक्कम रु. 117696/- ची पावती नस्ती सोबत आहे. तथापी, उर्वरित रु. 473110/- आणि रु. 40100/- रकमांची पावती प्रकरणा सोबत आढळून आली नाही. तसेच एकुण कॅपिटेश फि रक्कम रु. 630906/- महानगरपालिका खात्यामध्ये प्रत्यक्ष भरणा केल्याबाबतचा अभिलेख (पोटकीर्द, चलन, बँक स्टेटमेंट) लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाही.त्यामुळे सदरची रक्कम महानगरपालिका खात्यामध्ये प्रत्यक्षात जमा झाली किंवा कसे? याची खातरजमा लेखापरीक्षणास करता आली नाही. अर्धसमास ज्ञापन क्र. 168, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे. तरी भरणा रकमांच्या चलनाच्या छायांकित प्रतिसह अनुपालन सादर करण्यात यावे.

**परिच्छेद .क्र.9.18. कॅपिटेशन शुल्क वसूलीची पावती अढळ न झालेबाबत...**

मौजे - नवघर, स. न. 295/4,5,6,7 (जूना), 178/4,5,6,7 (नविन)

निवासी व वाणिज्य ईमारत A-तळ + 8, B-तळ + 7, C-तळ + 7.

तात्पुरता (Provisional) ना-हरकत दाखला क्र. MBMB/FIRE /196/2013-14, दि. 09/04/2013.

कायम ना-हरकत दाखला - क्र. MBMC/FIRE/1483/2017-18, दि.31/03/2017.

| अ.क्र. | ईमारत | उंची | बांधकाम क्षेत्र | | | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वाणिज्य | निवासी | एकुण क्षेत्र | |
| 1 | A-तळ + 8 | 27.10 | 288.56 X 110 | 3525.19 X 55 | 3813.75 | |
| | | | 31742 | 193885 | - | 225627 |
| 2 | B-तळ + 7 | 23.85 | 259.22 | 1346.06 | 1605.28 | |
| 3 | C-तळ + 7 | 23.85 | 263.92 | 1702.02 | 1965.94 | |
| B-तळ + 7 व C-तळ + 7 तपशिल | | | 523.14 X 55 | 3048.08 X 22 | 3571.22 | |
| | | | 28773 | 67058 | - | 95831 |
| एकुण कॅपिटेशन शुल्क | | | | | | 321458 |

**अभिप्राय :-**

1) देय कॅपिटेशन फि रक्कम रु. 321458/- एवढी असून पैकी रु. 1500/- पावती क्र. 850440 अन्वये दि. 18/04/2017 रोजी वसूल केली असून सदर पावतीची छायांकित प्रत नस्तीसोबत आहे. उर्वरित

(321458-1500) रु. 319958/- वसूली संदर्भात पावती नस्तीसोबत आढळून आली नाही. त्यामुळे सदरची वसूली झाली किंवा कसे? याची लेखापरीक्षणात खातरजमा करता आली नाही.

2) सदर विषयाची पोटकिर्द, पावती पुस्तके आणि बँक विवरणपत्रक लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत.

त्यामुळे वसूल झालेल्या रकमांचा प्रत्यक्ष बँक विवरणावरुन/ताळमेळ घेता आला नाही. अर्धसमास ज्ञापन क्र. 169, दि.

13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे.

बँक खात्यामध्ये जमा रकमांचा उपरोक्त क्र. 1 मध्ये निर्देश केल्याप्रमाणे कार्यवाही करुन अहवाल सादर करण्यात यावा.

**परिच्छेद .क्र.9.19, अग्निशमन ना-हरकत दाखला नूतनिकरण न केलेबाबत.-**

मौजे - भाईंदर गांव, स.नं. 216/3 (a) (नविन), 555/3 (a) (जूना)

ईमारत - "जिवन आशा" निवासी आणि वाणिज्य (तळ + 7 मजले)

अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखला क्र.MBMB/FIRE/490/2016-17, दि. 09/09/2016.

| अ.क्र. | तपशिल | निवासी | वाणिज्य | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | बांधकाम क्षेत्र | 1675.67<br>x 22 | 115.20<br>x 55 | 1790.87 |
| 2 | कॅपिटेशन शुल्क | 36865<br>10% | 6336<br>25% | 43201 |
| 3 | नूतनिकरण<br>i) तपासणी शुल्क<br>ii) नुतनिकरण शुल्क | <br>3687<br>- | <br>1584<br>- | <br>5271<br>1100 |
| | एकुण शुल्क | 3687 | 1584 | 6371 |

**अभिप्राय :-**

1) अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 पर्यंत असल्यामुळे दि. 01/01/2020 रोजी दाखल्याचे नूतनिकरण करणे आवश्यक आहे. परंतु नस्तीची पडताळणी केली असता, नुतनिकरण केले नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी सदर प्रकरणी उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे तपासणी शुल्क आणि नुतनिकरण शुल्क एकुण रक्कम रु. 6371/- संबंधीतांकडून वसूल करुन दाखल्याच्या नुतनिकरणासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी.

2) वसूल करण्यात आलेल्या कॅपिटेशन शुल्क रक्कम रु. 434257/- (43201-8950) ची पावती आढळून आली नाही. यासंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्र. 170, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून

देखील पुर्तता लेखापरीक्षणास सादर केली नाही. सबब परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे पूर्तता करुन पूर्तता अहवाल अनुपालनासोबत सादर करावा.

**( वसुलपात्र रक्कम रु.6,371/- )**

**परिच्छेद .क्र. 9.20:- ना-हरकत दाखला नुतनिकरण न केलेबाबत--**

मौजे-नवघर, स.क्र. 29/9,12,13,17, 31/2 (नविन)

228/9,12,13,17, 235 (जूना)

शैक्षणिक इमारत बांधकाम - स्टील्ट + 7

तात्पुरता ना-हरकत दाखला - No/ MBMC/FIRE/257/2012-13, दि. 03/07/2012

अंशत: पूर्ण बांधकाम - स्टील्ट + 3 - ना-हरकत दाखला No. MBMC/FIRE/167/2014-15, दि. 06/06/2014

ना-हरकत दाखल्याचे नूतनिकरण क्र. MBMC/FIRE/142/2016-17, दि. 07/06/2016

**अभिप्राय :-**

स्टील्ट + 7 पैकी स्टील्ट + 3 अंशत: पूर्ण बांधकामासाठी ना-हरकत दाखला दि. 06/06/2014 रोजी दिलेला असून, सदरचा दाखला दि. 31/12/2016 पर्यंत विधीग्राह्य (Valid) असून दि. 01/01/2017 रोजी नव्याने नुतनिकरण करुन घेणे आवश्यक आहे. तथापी, नस्तीमधील कागदपत्रांची तपासणी केली असता, दि. 01/01/2017 रोजी नुतनिकरण केलेले नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे. सबब रक्कम रु. 30608/- (तपासणी शुल्क) आणि नुतनिकरण शुल्क रु. 1100/- असे एकुण रु. 31708/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे. यासंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्र. 171, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील लेखापरीक्षणास पुर्तता सादर करण्यांत आली नाही. सबब परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करण्यात यावा

**( वसुलपात्र रक्कम रु.31,708/- )**

**परिच्छेद .क्र. 9.21. अग्निशमन विभागाकडील ना-हरकत दाखला वार्षिक नुतनिकरण करणेबाबत...**

मौजे-भाईंदर, स.क्र. 473/3, 474/4 (D) 475, 476, 477 (जुने)

ईमारत "अंबा एंटरप्रायझेस" G+7 (व्यापारी)

अंतिम ना-हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/125/2016-17, दि. 30/05/2016,

कॅपिटेशन शुल्क - 1559.46 चौ.मी. X रु. 44 रु. प्र.चौ.मी. = रु. 68616/-

**अभिप्राय** :-

1) सदरच्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 पर्यंत असल्यामुळे दि. 01/01/2017 रोजी दाखल्याचे नूतनिकरण करणे आवश्यक आहे.

2) तथापी, नुतनिकरण केल्याची नस्तीमध्ये आढळून आले नाही. अर्धसमास ज्ञापन क्र. 172, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे. तरी सदर नुतनिकरण करण्यात येवून खालील नमुद केल्याप्रमाणे रक्कम रु. 18254/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

i) तपासणी शुल्क रु. 68616 X 25% = रु. 17154/-
ii) नुतनीकरण शुल्क = रु. 1100/-
= रु. 18254/-

परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करण्यात यावा.

**( वसुलपात्र रक्कम रु.18,254/- )**

**<u>परिच्छेद .क्र.9.22. ना-हरकत दाखला नुतनिकरण शुल्क वसूल न केलेबाबत..</u>**

मौजे-घोडबंदर, स.क्र. 7/1, निवासी ईमारत "राज एक्सोटिना" विंग D,E,F,

इमारत उंची - 23.95 मिटर (तळ+7), बांधकाम क्षेत्र - 4806.16 मीटर,

अंतिम ना-हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/79/2016-17, दि. 09/05/2016,

कॅपिटेशन शुल्क - 9824.00 पैकी 4806.16 X रु. 22 = 105736/-

**<u>अभिप्राय</u> :-**

1) अग्निशमन विभागाने दिलेल्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 पर्यंत असल्यामुळे दि. 01/01/2017 रोजी दाखल्याचे नूतनिकरण करणे आवश्यक आहे.

2) सदर नस्तीचे अवलोकन केले असता दाखल्याचे नूतनिकरण करण्यात आलेले नसल्याचे आढळून आले आहे. अर्धसमास ज्ञापन क्र. 173, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे. तरी नूतनीकरणासाठी अनुज्ञेय असलेले एकुण शुल्क रु. 11,674/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

i) तपासणी शुल्क रु. 105736 X 10% = रु. 10574/-

ii) नुतनीकरण शुल्क = रु. 1100/-

रु. 11674/-

परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करण्यात यावा

**( वसुलपात्र रक्कम रु.11,674/- )**

**परिच्छेद .क्र. 9.23. ना-हरकत दाखला नुतनिकरण शुल्क वसूल न केलेबाबत...**

मौजे-गोडदेव गांव, स. नं. 327/1, 2, 4 ते 9, 11, 12, 14 ते 19, 21, 22, 24, 25, 328/1 ते 4, 329/1 ते 7, 10, 11,

330/7, 331/4(B), 339/2, 340/1 ते 12, 341/6

निवासी इमारत "सॉलिटेअर हाईट्स" विंग-एफ, तळ+7,

बांधकाम क्षेत्र 2297.78 चौ.मी., उंची 22-80 मीटर,

अंतिम ना-हरकत दाखला क्र. MBMC/F 1RE/457/2016-17, दि. 02/09/2016,

कॅपिटेशन फि - 2297.78 चौ.मी. X 22 रु.प्र.चौ.मी. = 50551/-

**अभिप्राय** :-

1) कॅपिटेशन शुल्क रु. 50,551/- प्राप्त झाल्याचे नमूद आहे. परंतु सदर रकमेची पावती आणि भरणा चलन नस्ती सोबत आढळून आले नाही.

2) अग्निशमन विभागाने निर्गमित केलेल्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity)दि.31/12/2016 पर्यंत असल्यामुळे दि. 01/01/2017 रोजी दाखल्याचे नुतनिकरण करुन घेणे आवश्यक आहे.

नस्तीचे अवलोकन केले असता, दाखल्याचे नुतनिकरण करण्यात आलेले नसल्याचे आढळून आले आहे. अर्धसमास ज्ञापन क्र. 174, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे. सबब नुतनिकरणासाठी अनुज्ञेय असलेले एकुण शुल्क रु. 6,155/- संबंधीताकडून वसूल करणे आवश्यक आहे.

i) तपासणी शुल्क रु. 50551 X 10% = रु. 5055/-

ii) नुतनीकरण शुल्क = रु. 1100/-

रु. 6155/-

परिच्छेदामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन पूर्तता अहवाल सादर करण्यात यावा.

**( वसुलपात्र रक्कम रु.6,155/- )**

**परिच्छेद .क्र.9.24:- अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत..**

मौजे - गोडबंदर, स. न. 77/1, 3

शाळा ईमारत बांधकाम, बांधकाम क्षेत्र - 3618.17 चौ.मी., उंची 15.90 मीटर,

कॅपिटेशन फी 3618.17 चौ.मी. X 33 रु. = 119400/-

अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखला - क्र. MBMC/FIRE/117/2016-17,

दि. 20/06/2016

**अभिप्राय :-**

1) कॅपिटेशन फी रक्कम रु. 119400/- पैकी रु. 114640/- वसूलीचा तपशिल (पावती भरणा चलन) तसेच वसूली पावती आणि भरणा चलनाची प्रत नस्तीसोबत आढळून आली नाही.

2) अग्निशमन विभागाने निर्गमित केलेल्या ना-हरकत दाखल्याची विधीग्राहयता (Validity) दि. 31/12/2016 असून दि. 01/01/2017 रोजी नूतनिकरण करणे आवश्यक आहे. तथापी, नस्तीचे पडताळणी केली असता, दाखल्याचे नुतनिकरण केल्याचे आढळून येत नाही. अर्धसमास ज्ञापन क्र. 175, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे. सबब तपासणी शुल्क आणि नुतनिकरण शुल्क असे एकुण रु. 30950/- संबंधिताकडून वसूल करुन दाखला नूतनिकरणाची कार्यवाही करण्यात यावी.

i) तपासणी शुल्क - कॅपिटेशन शुल्क रु. 119400 X 25% = 29850/-

ii) नुतनिकरण शुल्क = 1100/-

30950/-

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करून पूर्तता अहवाल सादर करण्यात यावा.

**( वसुलपात्र रक्कम रु.30,950/- )**

**परिच्छेद क्रमांक - 9.25. अग्निशमन ना-हरकत दाखल्याचे नुतनिकरण न केलेबाबत...**

मौजे - नवघर, स. न. 225/1,2,3,4,8, 237/5,6, 238/2,3 (जूने), 118/1,2,3,4,8, 186/5,6, 187/2 (नविन)

निवासी व वाणिज्य ईमारत "मिताली राईट्स" (विंग-बी) तळ + 10 मजले बांधकाम क्षेत्र - 6051.59 चौ.मी., उंची

32.20 मीटर

कॅपिटेशन फि 6051.59 चौ.मी. X 22 रु. = 138875/-

2445.00 चौ.मी. X 55 रु. = 134475/-

273350/-

अंतिम अग्निशमन ना-हरकत दाखला - क्र. MBMC/FIRE/112/2016-17, दि. 26/05/2016

**अभिप्राय :-**

1) उपरोक्त प्रकरणी जमा रक्कम रु. 273350/- ची पावती भरणा चलन नस्तीसोबत आढळून आली नाही. सबब सदरची रक्कम महानगरपालिका खाती प्रत्यक्ष जमा झाली किंवा कसे? याची लेखापरीक्षणात खातरजमा करता आली नाही.

2) अंतिम अग्निशमन विभागाचे ना-हरकत दाखल्याची विधीग्राह्यता (Validity) दि. 31/12/2016 असून दि. 01/01/2017 रोजी सदर दाखल्याचे नूतनिकरण करणे आवश्यक आहे. मात्र नस्तीचे अवलोकन केले असता, नूतनिकरण करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी नूतनिकरण शुल्क आणि तपासणी शुल्क रक्कम रु. 28435/- संबंधीतांकडून वसूल करुन नूतनिकरण बाबतची कार्यवाही करण्यात यावी.

i) तपासणी शुल्क - कॅपिटेशन शुल्क रु. 273350 X 10% = 27335/-

ii) नुतनिकरण शुल्क = 1100/-

28435/-

3) ईमारत निवासी आणि वाणिज्य वापरासाठी आहे. परंतु संपूर्ण बांधकाम क्षेत्रावर निवासी दराने कॅपिटेशन शुल्क वसूली करण्यांत आलेली आहे. याबाबत तरतूदीसह खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा. अन्यथा निवासी आणि वाणिज्य वापरासाठीच्या क्षेत्रानुसार निवासी क्षेत्रासाठी निवासी दराने आणि वाणिज्य क्षेत्रासाठी वाणिज्य दराने कॅपिटेशन शुल्क वसूल करण्यात करण्यात यावा. यासंदर्भात अर्धसमास ज्ञापन क्र. 176, दि. 13/03/2020 अन्वये पूर्तता करणेबाबत कळवून देखील पुर्तता अप्राप्त आहे. याबाबत तरतूदीसह खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा.

उपरोक्त मुद्यांचे संदर्भात पूर्तता अहवाल अनुपालनासोबत सादर करण्यात यावा.

**( वसुलपात्र रक्कम रु.28,435/- )**

## 2017-18

# अग्निशमन विभाग

**परिच्छेद क्र.11.1 :- सर्व्हे क्र. 15/2अ घोडबंदर या भुखंडावरील स्टोरेज बिल्डींग अे व बी प्रकरणी नगररचना विभागाचे इमारतीच्या नकाशांना मंजुरी नसलेबाबत.**

अर्जदार तेजस कन्सल्टंट याना सर्व्हे क्र.15/2अ घोडबंदर या भुखंडावरील स्टोरेज बिल्डींग अे व बी (तळ + 2 पार्ट) या प्रस्तावित इमारतीसाठी तात्पुरती एन.ओ.सी.अग्निशमन विभागाकडील. जा.क्र. क्र.मिभा/अग्नि/989/2017-18दि.23/12/2017 अन्वयेतात्पुरती एन.ओ.सी. देण्यात आली आहे. परंतु नगररचना विभागाकडून सर्व्हे क्र. 15/2अ घोडबंदर या भुखंडावरील स्टोरेज बिल्डींग अे व बी इमारतीच्या नकाशांना मंजुरी आदेश दिल्याचे प्रकरण (नस्ती) सोबत दिसून येत नाही. सदर मंजुरी आदेश अर्धसमास ज्ञापन क्र.**4** दि.29/01/2021 अन्वये त्वरीत लेखा परीक्षणास सादर करणेबाबत कळविणेत आले असता सदरचा मंजुरी आदेश लेखा परीक्षणास अप्राप्त आहे. सदर प्रकरणी तेजस कंल्सटंट तर्फे अर्ज सादर करण्यात आला असून पावती क्र. 20185 दि.26/12/2017 अन्वये रक्कम रु.88000/- चेक क्र.028918 नुसार कॅपिटेशन फी सुर्यदिप्ता प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड या नावाने जमा करण्यात आली आहे. इमारतीचे एकूण बांधकाम 1921.63 चौ.मी.केले असून कॅपिटेशन फी रु.88000/- ची आकारणी कशी करण्यात आली याबाबतचा तपशिल लेखा परीक्षणास उपलब्ध करण्यात आलेला नाही.

**परिच्छेद क्र.11.2 :- तळघर 1+ तळघर 2+ तळ + 23 मजले रहिवास व वाणिज्य इमारतीसाठी तात्पुरता ना हरकत दाखला व कॅपीटेशन फी बाबत.**

पेणकर पाडा येथील सर्व्हे क्र.235PT,(जुना) 256PT (नवा) 68PT या भुखंडावरील निवासी व वाणिज्यिक इमारतीचा (उंची 68.95, वानिज्य क्षेत्रफळ 277.83 रहिवासी क्षेत्रफळ 11228.91) ना हरकत दाखला क्र.मनपा/अग्नि/937/2017-18 दि.05/12/2017 बाबतच्या संचिकेतील दि.04/12/2017 च्या टिपणी क्र.मिभा/मनपा/अग्नि/110/2017-18 मध्ये तळघर 1+ तळघर 2+ तळ + 23 मजले इमारतीसाठी असल्याचे नमुद केले आहे. मा.महासभा ठराव क्र.114 दि.18/02/2012 अन्वये मंजुरी दिलेल्या मंजुर दरसुची मध्ये तळघरासाठी मंजुर दराचा तपशिल आढळून येत नाही.त्यामुळे तळघर 1+ तळघर 2 बांधकाम क्षेत्रफळापोटी जमा होणाऱ्या कॅपीटेशन फी व ना हरकत दाखला याचे महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. तसेच अर्धसामासिक **ज्ञापन क्र.10** दि.09/02/2021 अन्वये तळघरासाठी मंजुर असलेल्या दराची सुची लेखा परीक्षणासाठी त्वरीत उपलब्ध करणे बाबत विनंती केली असता दरसुची उपलब्ध् करण्यात आली नाही. तरी तळघर 1+ तळघर 2 बांधकाम क्षेत्रफळापोटी क्षेत्रफळा प्रमाणे कॅपीटेशन फी आकारणी करुन वसुल होणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र.11.3:- सर्व्हे क्र./हिस्सा क्र.207, 217 ते 220,228 पै ते 230 पै,175,187,236, 238, 239, 244, 255 ते 258, 231 ते 235, 240/2 मौजे पेणकरपाडा येथे रहिवास इमारत बाबत.**

अर्जदार अविनाश म्हात्रे आणि असोशिएट यांना तात्पुरता ना हरकत दाखला जा.क्र.MBMC/FIRE/562/2006-07 दिनांक 20/03/2007 देण्यात आलेला आहे. सदर दाखल्यामध्ये खालील प्रमाणे अर्जदार यानी इमारत बांधकाम प्रकार A 3, A 4 ची मागणी केली आहे.

TYPE-A-3 337,338,340,341,343,346,347,349,350

TYPE A-4= 336,339,342,345,348,351.

अग्निशमन विभाकडील ना हरकत दाखला जा.क्र.MBMC/FIRE/562/2006-07 मध्ये अर्जदार यांनी पावती क्र. 172177 दिनांक 17/03/2007 अन्वये रक्कम रु.3291500/-(दर रु.40/- X क्षेत्र 82283 चौ.मी.) प्रमाणे भरलेली दिसून येते.

अर्जदार यांचे दिनांक 24/01/2018 चे बांधकाम क्षेत्रफळ विवरणानुसार इमारत बांधकाम प्रकार A-3=337,338,340 आणि इमारत बांधकाम प्रकार A-4 339 या बांधकाम इमारतींचा FINAL NO OJECTION CERTIFICATE ची MBMC/FIRE/1533/2017-18 दिनांक 14/03/2018 मागणी केली आहे.त्यानुसार अस्तित्वात (सन 2017-18) असलेल्या दरानुसार कॅपीटेशन फी वसुल करण्यात आलेली आहे. उर्वरीत TYPE A-3- 341,343,346,347,349,350 आणि TYPE A-4- 336,342,345,348,351 या इमारतींचे बाधकाम सन 2017-18 पर्यंत पूर्ण झाले किंवा कसे, तसेच त्याची कॅपीटेशन फी त्या त्या इमारत बांधकाम प्रकारानुसार व दरानुसार वसुल करण्यात आली किंवा कसे याचा खुलासा होणे आवश्यक आहे. सदर इमारती 10 वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही FINAL NO OJECTION CERTIFICATE ची मागणी करण्यात आल्याचे दिसून येत नाही. सबब,इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले अगर कसे? याबाबत माहिती द्यावी: किंवा TYPE A-3- 341,343,346,347,349,350 आणि TYPE A-4- 336,342,345,348,351 या इमारतींचे कॅपीटेशन फी त्या त्या इमारत बांधकाम प्रकारानुसार व दरानुसार वसुल करण्यात यावी व तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करण्यात यावे.

अर्धसामासिक ज्ञापन क्र.12 दि.15/02/2021 अन्वये याबाबत माहिती मागणी करुनही माहिती अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.11.4 :- मे. अनिष आणि असोशिएट सर्व्हे नं. जुना 181/7pt, 7pt, 9, 10, 182/4,5,6,8 गांव मिरा कॅपीटेशन फी.**

सदर सर्व्हे नंबरावरील रहिवासी इमारत (उंची 46.85) stilt +15 श्री शास्वत इमारत नं.19 (इमारत A) एकूण बांधकाम 4083.39 चौ.मी.बांधकामाची कॅपीटेशन फी रुपये 612510/-अग्निशमन विभागाकडील ना हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/1463/2017-18 दि.01/03/2018 रोजी रु.330030/- भरणा केल्याचे दिसून येते.

तसेच अग्निशमन विभागाकडील ना हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/103/2011-12 दि.18/06/2011 पावती क्र.524*** दि.18/05/2011 अन्वये रु.1412400/- बांधकाम 14124 चौ.मी.पोटी भरणा केले आहेत 14124 X 150 = 2118600/- भरणा करणे आवश्यक असताना रु.1412400/- वना हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/1463/2017-18 दि.01/03/2011 नुसार भरलेली रक्कम व रु.330030/- असे एकूण 1742430/- वजा जाता संबंधितांकडून रु.376170/- इतकी रक्कम कमी वसूल केली असल्याचे दिसून येते.सदरची कमी वसूल केलेली रक्कम वसूल करुन अनुपालन सादर करण्यात यावे.

याबाबत अर्धसामासिक ज्ञापन क्र.**13** दि.17/02/2021 देण्यात आले होते परंतु अनुपालन सादर करण्यात आले नाही.अदयाप अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.11.5 :- मे. युनायटेड रबर इंडस्ट्रिज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड नुतनीकरण दाखला**

मे.युनायटेड रबर इंडस्ट्रिज प्रा.लि., जय वेलंकनी इंड इस्टेट, मिरा-भाईंदर रोड यांना दि.09-03-2018 च्या जा.क्र. मिभा/मनपा/अग्नि/1515/ 2017-18 अन्वये ना हरकत दाखला देण्यात आलेला आहे.तथापि, अर्जदाराकडून किती शुल्क वसूल करण्यात आले याचा तपशील दाखल्यात नमूद नाही.सदर दाखला प्रकरणाच्या नस्तीत जोडलेल्या दि.06-03-2018 च्या कार्यालयीन टिपणी क्र. मिभा/मनपा/अग्नि/128/2017-18 मध्ये महासभेच्या दि.18-02-2012 च्या ठराव क्र. 114 प्रकरण क्र. 108 अनुसार रु.98000/- इतकी फी आकारल्याचे नमूद केलेले आहे.तसेच नस्तीत जोडलेल्या, सदर कारखान्याच्या दि.08-02-2019 च्या पत्रानुसार सदर कारखाना इमारतीचे ना हरकत दाखला नूतनीकरण शुल्क रु.25600/- मात्र दि.07-02-2019 च्या धनादेश क्र. 001538 अन्वये अदा केल्याचे दिसून येते.

उक्त ठरावानुसार कारखाने/गोडाऊन/वेअर हाऊस/सिनेमा थिएटर/नाटयगृह/पेट्रोल पंप इ. साठी कायम स्वरुपी आग विझविण्याच्या यंत्रणेची वार्षिक तपासणी शुल्क/दाखला नुतनीकरण शुल्क कॅपीटेशन फी च्या ¼ पट इतके निश्चित करण्यात आलेले आहे.

त्यानुसार उक्त रु.98000/- तसेच रु.25600/- इतक्या ना हरकत दाखला नूतनीकरण शुल्क रकमेची अचूकता पडताळणी करण्यासाठी कॅपीटेशन फी बाबतची कागदपत्रे शोधली असता सदर नस्तीत जोडलेली दिसून आली नाहीत. त्यामुळे पडताळणी करता आली नाही.

सदर कारखान्याच्या इमारतीच्या बांधकाम नकाशास मिरा-भाईंदर नगरपरिषदेने दि. 24-09-1992 रोजी मंजूरी दिली असल्याचे नस्तीत जोडलेल्या बांधकाम नकाशावरील नोंदीवरुन दिसून येते. तसेच सदर कारखान्याच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याने सन 2000-2001पासून कर निर्धारण करण्याबाबतचा सदर अर्जदाराचा अर्ज नगरपरिषदेस दि.30-09-2000 रोजी प्राप्त झाला असल्याचे दिसून येते.

तथापि, बांधकाम नकाशा मंजूरीवेळी/ बांधकाम पूर्ण झाल्यावर तसेच तदनंतर मंजूर सुधारित दरांनुसार आकारलेल्या कॅपिटेशन फी व ना हरकत दाखला नूतनीकरण फी बाबतची कागदपत्रे नस्तीत जोडलेली आढळून आली नाहीत. त्यामुळे कॅपिटेशन फी तसेच दरवर्षी आकारलेल्या ना हरकत दाखला नूतनीकरण फी ची अचूकता पडताळणी करता आली नाही.

याबाबत सर्व अनुषंगिक कागदपत्रांसह अनुपालन सादर करावे.

अर्धसामासिक ज्ञापन क्र.**14** दि.17/02/2021 अन्वये अनुपालन सादर करणे बाबत कळविले असता सदचे अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र. 11.6 :- मे. अनिष आणि असोशिएट सर्व्हे नं. 11/2/1A, 2/1B, 3,4,5,6,7, 12/4 रहिवासी इमारत विंग F आणि G गांव काशी**

सदर नस्तीचे अवलोकन केले असता खालील उणिवा आढळून आल्या

1. तात्पुरता ना हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/236/2012-13 दिनांक 28/06/2012 नस्ती सोबत आढळून आला नाही

2. अग्निशमन विभागाकडील तात्पुरता ना हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/236/2012-13 दिनांक 28/06/2012 मध्ये रु.1125080/- कॅपीटेशन फी भरले बाबत नमुद केले आहे मात्र रक्कम भरले बाबतची पावती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही.

3. कार्यालयीन टिपणी क्र.मिभा/मनपा/अग्नि/84/2017-18 मध्ये नमुद केले प्रमाणे आर्कीटेक्ट यांचे एकूण बांधकाम क्षेत्रफळाबाबतचे दिनांक 25/07/2017 चे पत्र नस्ती सोबत आढळून आले नाही त्यामुळे एकूण बांधकाम क्षेत्रफळाची खात्री करता आली नाही.

सबब दि. 25/07/2017 चे आर्कीटेक्ट यांचे पत्र तसेच अग्निशमन विभागाकडील ना हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/236/2012-13 दिनांक 28/06/2012 अन्वये तात्पुरत्या ना हरकत दाखल्यामध्ये नमुद केलेली कॅपीटेशन फी रक्कम रु.1128080/- भरले बाबत अनुपालन सादर करावे.

याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. **15** दि.17/02/2021अन्वये अनुपालन सादर करणेबाबत सुचित करण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.11.7:- निवासी इमारत आर्केड आर्ट इमारत नंबर 3 विंग A, B, & C सर्व्हे नं./हिस्सा नं. 109/3, 6, 11/10, 121/1, 2, 8 गांव घोडबंदर.**

अर्जदार मे.आर्केड आर्ट रिअल्टी एकूण बांधकाम क्षेत्रफळ 9422.51 चौ.मी.रहिवासी इमारतीसाठी प्रोबेशन ऑक्युपेशनची मागणी केलेली आहे.त्यानुसार होणारी रक्कम रु.1413377/- एवढी असून ना हाकरत दाखला क्र. MBMC/FIRE/257/2017-18 दि.30/06/2017 मध्ये रक्कम रुपये 1036476/- एकूण भरलेल्या रकमेतून (रु. 3238483/- मधून) वजा करुन प्रोबेशनरी ऑक्युपेशनची मागणी केलेली आहे.
अर्जदार यांचेकडून खालील प्रमाणे रक्कम वसुल होणे बाकी असतांना प्रोबेशनरी ऑक्युपेशनची मागणी कशी मान्य करण्यात आली याबाबत अनुपालन सादर करावे.

| विकासकाच्या दि.16/04/2014 चे पत्रा प्रमाणे एकूण बांधकाम क्षेत्रफळ | MBMC कॅपीटेशन फी प्रमाणे होणारी रक्कम रु. | अर्जदर/विकासकाने | | शिल्लक वसुल करावयाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| | | भरलेली रक्कम रु. | पावती क्रमांक | |
| 29440.75 | 4416113/- | 351137/- | 706975 | 1177630/- |
| | | 2887346/- | 7070 | |

अर्जदार/विकासकाकडून रक्कम रुपये 1177630/- वसुल करुन अनुपालन सादर करावे.

याबाबत अर्धासमास ज्ञापन क्र.16 दि.23/02/2021 अन्वये अनुपालन सादर करणेबाबत सुचित करण्यात आले होते .परंतु अनुपालन अप्राप्त आहे.

**वसुलपात्र रक्कम रु.1177630/-**

**परिच्छेद क्र.11.8 :- रहिवासी कम वाणिज्य इमारत नं. 1,2 आणि 3 Plot B सर्व्हे नं./ हिस्सा नं.210/2,3 गांव घोडबंदर आणि सर्व्हे नं./हिस्सा नं.16/4, 17/1 गांव काशी.**

सदर नस्तीचे अवलोकन केले असता खालील उणिवा आढळून आल्या

(1) तात्पुरता ना हरकत दाखला क्र. MBMC/FIRE/1550/836/2012-13 अन्वये प्लॉट A रहिवासी कम वाणिज्य इमारत नं. 1,2 आणि 3, प्लॉट B सर्व्हे नं./हिस्सा नं. 210/2,3 गांव घोडबंदर आणि सर्व्हे नं./हिस्सा नं.16/4,17/1 गांव काशी असा दिसून येतो. त्यामुळे कोणत्या सर्व्हे नंबर साठी ना हरकत दाखला देण्यात आला या बाबत खात्री करता येत नाही.

(2) सदर इमारत बांधकामाचा नकाशा पाहता नकाशा मध्ये रहिवासी इमारतीचे क्षेत्रफळ 00 असे नमुद केल्याचे दिसून येते. त्यामुळे अ.क्र.1 मध्ये नमुद केलेला तात्पुरता ना हरकत दाखला कशाचे आधारे देण्यात आला याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

(3) मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे बांधकाम प्रारंभ पत्र क्र.मिभा/मनपा/नर/996/2013-14 दि. 21/06/2013 मधील संदर्भ क्रमांकातील अ.क्र.4 नुसार तात्पुरता ना हकरत दाखला दिलेला आहे. सदर बांधकाम प्रारभ पत्रातील अटी व शर्ती मधील अट क्र.1 नुसार सदर भूखंडाचा वापर औद्योगिक वापरासाठीच करण्याचा आहे असे स्पष्ट नमुद केले आहे.

(4) जा.क्र./मिभा/मनपा/अग्नि/130/2017-18 टिपणीमधील संदर्भ क्र.3 अन्वये तात्पुरता ना हरकत दाखल्यानुसार बांधकाम प्रारंभ पत्र भूखंड A च्या मर्यादित दिलेला असून औद्योगिक कारणासाठीच भूखंडाचा वापर करणेचा आहे. वरील विसंगतीबाबत अनुपालन सादर करावे.

याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.**17** दि.23/02/2021 अन्वये अनुपालन सादर करणेबाबात सुचित करण्यात आले होते अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र. 11.9 :- मे.अनिष आणि असोशिएट सर्व्हे नं. नविन 377/1 ते 7, 213/3pt, 3pt 2,4,5 (old) 684/1 ते 7, 553/3 pt, 3pt 2,4,5. गांव भायंदर**

सदर नस्तीचे अवलोकन केले असता खालील उणिवा आढळून आल्या.

(1) ना हारकत दाखला क्र. MBMC/NR/4580/2015-16 दि. 30/01/2016 अन्वये सर्व्हे नं. नविन 377/1 ते 7, 213/3pt, 3pt 2,4,5 (old) 684/1 ते 7,553/3 pt, 3pt 2,4,5. गांव भायंदर ना हरकत दाखला अदा करण्यात आला आहे.परंतु सदर ना हरकत दाखल्यापोटी रक्कम रु.862844/- भरणा केले बाबतची पावती नस्ती सोबत आढळून आली नाही.

(2) जा.क्र. मिभा/मनपा/नर/2266/2016-17 दि.08/08/2016 अन्वये सुधारीत बांधकाम प्रारंभपत्र (इमारत क्र.5 व 8 च्या मर्यादेत) मधील क्र.1 अन्वये रहिवासी+ वाणिज्य वापरासाठी परवानगी दिल्याचे दिसून येते. मात्र अग्निशमन विभागाकडील ना हकरत दाखला क्र. MBMC/FIRE/566/2017-18 दि.07/09/2017 चे तात्पुरत्या प्रोव्हीजनल परवानगीमध्ये केवळ रहिवासी इमारत असा उल्लेख करण्यात आला आहे.

(3) रहिवासी क्षेत्र व वाणिज्य क्षेत्र नमूद केले नसल्यामुळे आकारण्यात आलेली कॅपीटेशन फी बरोबर असल्याची धारणा पक्की (पडताळणी) करता येत नाही. याबाबत धारणा पक्की (पडताळणी)करुन अनुपालन सादर करण्यात यावे.

वरील त्रुटींची पुर्तता करुन अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

अर्धसमास ज्ञापन क्र.**18** दि.23/02/2021 अन्वये अनुपालन सादर करणेबाबत कळविले असतांना अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.11.10:- कॅपीटेशन फी वसुली बाबत.**

आर्चीसन आर्कीटेक्ट आनंद शहा व हर्ष शहा रहिवासी इमारत सी.टी.एस नं.1681 ते1735 गांव भाईंदर या भूखंड वरती इमारत टाईप -A (2 WING) इमारत उंची 23.95 चौ.मी. व इमारत टाईप B उंची 56.10 चौ.मी.ना हरकत दाखलाजा.क्र. MBMC/FIRE/128/2010-11 दि.25/05/2011 अन्वये तात्पुरता ना हरकत दाखला देण्यात आला आहे (GR +2 पोडीयम + स्टिल्ट + 15 मजले) इमारत बांधकाम क्षेत्रफळ 9442.82 चौ.मी.साठी रु.896920/- एवढी रक्कम भरले बाबत ना हरकत दाखला जा. क्र.MBMC/FIRE/128/2010-11 दि.25/05/2011 मध्ये नमूद केले आहे.

तसेच ना हरकत दाखला जा.क्र.MBMC/FIRE/227/2014-15 दि.24/072017 अन्वये रक्कम रु.10400/- पावती क्र.721668 दि.24/07/2014 अन्वये रक्कम भरणा केल्याचे दिसते परंतु सदर दोन्ही रकमांच्या पावत्या नस्ती सोबत आढळून आल्या नाहीत. त्यामुळे सदर रकमा महापालिकेच्या तिजोरीत जमा झाल्याची खातरजमा करता आली नाही.

सदरच्या दोन्ही पावत्यासह (रक्कम रु.896920/- व रु.10400/-) अनुपालन सादर करणे बाबत अर्धसमास ज्ञापन क्र. **19** दि. 23/02/2021अन्वये सुचित करण्यात आले होते.

**परिच्छेद क्र.11.11:- सर्व्हेनं.जुना 219/5 नवीन 193/5 नवघर येथील भूखंडावरील इमारत बाबत.**

मे.अविनाश म्हात्रे आणि असोशिएट यांना अग्निशमन विभागाकडील ना हरकत दाखला क्र.573/2017-18 अदा केल्याचे दिसून येते.सदरची इमारत ही मिक्स आक्युपंशी इमारत असून इमारतीची उंची 19.05 व एकूण बांधकाम क्षेत्रफळ 1280.00 चौ.मी.करण्यात आले आहे.याबाबत खालील उणिवा आढळुन आल्या.

1. मिक्स ऑक्युपंशी मध्ये इमारत कोणत्या प्रकारची आहे याबाबत बोध होत नाही.(उदा. इमारत रहिवासी + व्यावसायिक, रहिवासी + वाणिज्य इत्यादी)

2. मिक्स आक्युपंशी बाबत कोणत्या दराने कॅपीटेशन फी आकारणी करण्यात आली आहे त्याबाबत दरसुची मध्ये दराचा उल्लेख नाही.

3. मिक्स ऑक्युपंशीमध्ये कोणते क्षेत्रफळ किती आहे याचा उल्लेख केला नसल्याने त्या त्या बांधकाम क्षेत्रफळानुसार कॅपीटेशनची फी आकारणी केली असल्याची पडताळणी करता आली नाही

4. इमारत बांधकाम G +4 उंची 19.05 एकूण बांधकाम क्षेत्रफळ 1280.00चौ.मी.करण्यात आले आहे. तसेच पावती क्र.3778 रक्कम रु.42300/- वसुल केले आहेत. सदर वसुल केलेली रक्कम बरोबर असल्याची खात्री पटत नाही.

वरील 1 ते 4 त्रुटींचे अनुपालन त्वरीत सादर करणेबाबत अर्धसमास ज्ञापन **20** दि.23/02/2021 सुचित करण्यात आले आहे.अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र. 11.12:- मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे पावती पुस्तके तपासणी केली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.**

1. पावती क्र.14697 रु.90125/- दि.11/10/2017 मे.अर्थ इंटरप्रायजेस यांना ना हकरत दाखला म्हणून देण्यात आला आहे. मात्र सदर पावतीच्या कार्बन कॉपीवरती कॅपीटेशन फी व ना हरकत दाखला फी असे दोन्ही नमुद करण्यात आले आहे. त्यामुळे नेमकी कोणती फी आकारणी करण्यात आली याचा बोध होत नाही. तसेच आकारणी करुन वसुल केलेली रक्कम बरोबर असल्याची धारणा निश्चिती होत नाही. तरी धारणा निश्चिती करण्यात यावी.

2. पावती पुस्तक क्र.147 पावती क्र.14601 ते 14700 तपासले असता प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता2011 नुसार नियम 64 प्रमाणे पावती पुस्तकाच्या शेवटी पृष्ठ संख्या प्रमाणित करुन स्वाक्षरी केलेली नाही.

3. पावती बुक क्रमांक 146 पावती क्र.14594 रक्कम रु.21000/- दि.06/11/2017 कॅपीटेशन शुल्क आकारण्यात आले आहे. सदरची रक्कम डिमांड ड्राफट नं.581843 दि.03/12/2017 ने जमा केल्याचे दिसून येते. डिमांड ड्राफट दिनांक 03/12/2017 चा असतांना दि.06/11/2017 रोजी पावती क्र.14594 आगाऊ पावती कोणत्या नियमान्वये देण्यात आली याबाबत अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

पावती क्र.29499 दि.30/01/2018 रु.5225/- ची पोटकिर्दला नोंद घेण्यात आलेली नाही. सदरची रक्कम महानगरपालिकेच्या खाती जमा असल्याचे अनुपालन सादर करण्यात यावे.

याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. **21** दि.23/02/2021 अन्वये सुचित करण्यात आले होते परंतु अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र. 11.13 :- स्टोरेज इमारत सर्व्हे नं./हिस्सा 159/1, G+4 घोडबंदर कॅपिटेशन फी कमी वसुली.**

अर्जदार भरत कुमार पटेलस्टोरेजइमारत बांधकाम क्षेत्रफळ 1555.30 चौ.मी.स्टोरेजइमारत उंची 21.60 मीटर त्यानुसार होणारी कॅपिटेशन फी रक्कम रु.68433/- एवढी असून ना हाकरत दाखला क्र. MBMC/FIRE/1798/2017-18 दि. 17/10/2017 नुसार पावती क्रमांक 14558 दिनांक 17/10/2017 अन्वये रक्कम रुपये 43600/- भरणा केल्याचे दिसून येते.उर्वरीत शिल्लक वसुल करावयाची रक्कम रु.24833/- वसुल करुन अनुपालन सादर करण्यात यावे.याबाबत अर्धसामासिक पत्र क्र.**23** दि.08/03/2021 देण्यात आले असून अनुपालन अदयाप अप्राप्त आहे.

| एकूण बांधकाम क्षेत्रफळ | MBMC कॅपीटेशन फी प्रमाणे होणारी रक्कम रु. | अर्जदर/विकासकाने | | शिल्लक वसुल करावयाची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| | | भरलेली रक्कम रु. | पावती क्रमांक | |
| 1555.30 चौ.मी. | 68433/- | 43600/- | 14558 | 24833/- |

**वसुलपात्र रक्कम रु.24833/-**

# शिक्षण विभाग

**परिच्छेद क्र. 12.1:- जमा रकमेचा तपशिल रोखवहीमध्ये नमुद न केले बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत शिक्षण विभागाचे वित्तीय वर्ष 2017-18 हया आर्थिक् वर्षाचे तपासणी केली असता खालील नमुद जमा रकमेबाबत रोखवहीमध्ये तपशिल नोंदविण्यात आलेला नाही.

1. दि.13-7-2017 रोजी रक्कम रु.2359/-, 4536/-,3898/-दि.21/03/2018 रोजी रक्कम रु.17832/- खाते क्र.446429374 मध्ये जमा दिसून येतात परंतु रोखवहीला जमा न घेतले बाबत खुलासा करावा.
2. दि. 11/01/2018 रोजी रु.13494/- रोख वहीला जमा दिसून येते सदरची रक्कम कोणाकडून व कशाची रक्कम कोणत्या लेखा शिर्षामध्ये जमा दर्शविण्यात आली आहे याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.
3. दि 08/01/2018 नलिनी डी मोरे रु.17832/- दि. 05/02/2018 श्री बाबुभाई मोहनभाई देसाई रु.31530/- दि.09/02/2018 श्रीमती यशोदेवी रामसुरत मिश्रा रु.12737/- यांचेकडून वसुली करण्यात आली आहे. कोणती वसुली आणि कोणत्या लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात आली याबाबत खुलासा करण्यात यावा.
4. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 नियम 75 अन्वये प्राप्त झालेल्या सर्व रक्कमेची पावतीने पोच देणे आवश्यक आहे अर्धसमास पत्र क्र.3 दिनांक 17/03/2021 अन्वये पडताळणीसाठी लेख्याची मागणी करुनही उपलब्ध करुन दिलेली नसल्याने जमा रकमा कोणत्या शिर्षाच्या आहेत व कोणत्या लेखाशिर्षा खाली जमा आहेत याची पडताळणी करता आलेली नाही.
5. जमा रक्कमेबाबत महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता 2011 नियम 84 अन्वये दिवसा अखेर पूर्वी प्राधिकृत अधिकाऱ्याकडून चलन तयार करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही

**परिच्छेद क्र :-12.2 :- ताळमेळ न घेतले बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील वेतन अनुदान कॅशबुक नोंदी नुसार दिनांक 31/03/2018 अखेर रोखवही प्रमाणे शिल्लक रक्कम रुपये 38,96,305/- शिल्लक दिसून येते व दिनांक 31/03/2018अखेर बॅंक पासबुक प्रमाणे 77,81,949/- इतकी रक्कम शिल्लक दिसून येते प्रत्यक्ष फरक रु.38,85,644/- इतकी जादा रक्कम बॅंक खाती दिसून येते. फरकाच्या रकमेचा ताळमेळ घेऊन अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र :- 12.3 :- भविष्य निर्वाह निधी अभिलेख्यातील अनियमितता**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या शिक्षक प्रवर्गाच्या भविष्य निर्वाह निधी लेख्यासाठी महाराष्ट्र सर्वसामान्य भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधीदल नियम 6(1) नुसार प्रत्येक वर्गणीदाराचे नावे खाते उघडून नियम 12 प्रमाणे त्यावरील व्याज रक्कमेची परिगणना करुन लेजर अकांऊट व वर्ग चारचे बृहतपत्रके प्रत्येक आर्थिक वर्षाच्या मार्च अखेर लेखे परिपूर्ण करणे आवश्यक असतांना बहुतांश लेख्यांची परिपूर्ण नोंदी घेतलेल्या दिसून येत नाहीत त्यामुळे प्रत्येक भविष्य निर्वाह निधी खातेदाराच्या व्याजाची परिगणना करुन जमा रक्कम व आर्थिक वर्षाच्या अखेरची शिल्लकेची योग्य ती पडताळणी करता आली नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील 466(5) परिशिष्ट - 5 प्रमाणे अभिलेखे परिपूर्ण नसल्याने आवश्यक ती पडताळणी करता आली नाही.

बृहतपत्रा प्रमाणे एकूण 31 मार्च 2018 अखेर जमा व बँक खाते तसेच कॅशबुक प्रमाणे 31 मार्च 2018 अखेर जमा रक्कम या बाबत ताळमेळ घेता न आल्याने बृहतपत्राप्रमाणे अखेरची शिल्लक व प्रत्यक्ष शिल्लक रकमेत किती तुट आहे याबाबत अर्धसमास पत्र क्र.2 दिनांक 17/03/2021 अन्वये लेखे मागणी करुनही अप्राप्त असल्याने दर्शविता आली नाही.

**परिच्छेद क्र :- 12.4 :- वेतन अनुदान नोंदवही बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाच्या वेतनासाठी 50% अनुदान रक्कम शासनाकडून व 50% अनुदान रक्कम महानगरपालिके मार्फत वितरीत केली जाते

वित्तीय वर्ष 2017-18 हया आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणात शासनाकडून 5,95,49,543/- इतके अनुदान रक्कम वेतनापोटी प्राप्त झालेली आहे. याबाबत खालील अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 62, 315, 317, 450 अन्वये नमुना नंबर 26 मध्ये अनुदान नोंदवही ठेवलेली नसल्याने प्राप्त झालेली अनुदानाची रक्कम ही 50% वेतन अनुदानाचीच असले बाबत व संदर रक्कम ही आर्थिक वर्ष 2017-18 या वर्षाच्या मागणी प्रमाणेच असल्याची पडताळणी करता आली नाही.

2. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता 2011 मधील नियम 317 अन्वये अनुदान मंजुरी आदेश / वित्तप्रेषण आदेश लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नसल्याने अनुदान जमा रक्कम व मजुरी आदेश (वित्तप्रेषण) प्रमाणे मंजुरी रक्कम हया बाबत अर्धसमास पत्र क्र.4 दिनांक 17/03/2021 अन्वये मागणी करुनी अप्राप्त असल्याने ताळमेळ घेता आलेला नाही.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. 05/ 05/2021

## // गोषवारा //

### मिळकत विभाग

**प्रकरण क्रमांक (१४)** :- उत्तन मार्केट मधील जागा भाडयाने देण्यास मान्यता देणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये मिरा-भाईंदर महापालिकेच्या भाईंदर (प.) उत्तनरोड उत्तन येथील मार्केट मधील जागा इच्छुक भाजी विक्रेते/ मासळी विक्रेते/ मटन-चिकन विक्रेते यांना भाडेतत्वावर देण्यासाठी जा.क्र.मनपा/मिळकत/47/2020-21 दि.6/11/2020 अन्वये खालील मार्केटसाठी निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ.क्र. | मालमत्तेचे नाव | ओटे (गाळा) नंबर |
|---|---|---|
| 1 | भाईंदर (प.) उत्तनरोड, उत्तन येथील मासळी मार्केट | 1,3,4,8,9,12,14,15,16 |
| 2 | भाईंदर (प.) उत्तन रोड, उत्तन येथील फूल मार्केट | 6,7,8,9,10,11,12,13,14 |
| 3 | भाईंदर (प) उत्तन रोड, उत्तन येथील मासळी मार्केट व फुलमार्केट या दोन्ही मार्केट मधील पत्राशेड | 1,2,3,4,5 |
| 4 | भाईंदर (.प) उत्तन रोड उत्तन येथील मटन/चिकन मार्केट | 2,5,6 |

वरील तकत्यात नमुद मार्केट मधील ओटया (गाळया) साठी निविदा प्राप्त झाल्या आहेत. महासभा दि.26/2/2018 ठराव क्र.90 मध्ये मंडईतील गाळयाचे भाडे प्रतिमाह भाडी/मासळी विक्रेत्यासाठी रु.500/- व मटन चिकन विक्रेत्यासाठी रु.1000/- प्रमाणे राहील याबाबत मान्यता देण्यात आली आहे. तथापी मासळी/फुल/मटन चिकन विक्रेत्यांनी खालील तक्त्यात नमुद केलाप्रमाणे चढयाभावाने दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | मार्केटचे नाव | ओटा(गाळा) क्र. | निविदा धारकाचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | मासळी मार्केट उत्तन | 8 | मॅफिल्डा राजेश लुझी | रु.7850/- |
| 2 | | 9 | अग्नेश जेम्सी बंडूक | रु.7500/- |
| 3 | | 12 | मारीया फ्रान्सीस गऱ्या | रु.7400/- |

| अ.क्र. | मार्केटचे नाव | ओटा(गाळा)क्र. | निविदा धारकाचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | फुल मार्केट उत्तन | 6 | नशीम शमील शाहा | रु.22184/- |
| 2 | | 6 | अब्दुल अजित शेख इब्राहिम | रु.19854/- |
| 3 | | 7 | लियाफत शराफत कुरेशी | रु.20224/- |
| 4 | | 7 | नवाब शेख | रु.18184/- |
| 5 | | 8 | खालुदा सादिक खान | रु.21786/- |
| 6 | | 9 | मोरेश्वर बाबुराव पाटील | रु.24444/- |
| 7 | | 10 | रेहन मुस्लीम शाहा | रु.23600/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | | 10 | शबिना शमिम शेख | रु.18198/- |
| 9 | | 11 | हसिना अन्वर शेख | रु.24901/- |
| 10 | | 12 | असलम इद्रिस खान | रु.25051/- |
| 11 | | 12 | जगदीशप्रसाद रामप्रसाद्र जैस्वाल | रु.19900/- |
| 12 | | 13 | अमनारा शम्सू खान | रु.22600/- |
| 13 | | 13 | लिना ट्रेव्हर मेन्डोसा | रु.12500/- |
| 14 | | 13 | मोहमद इद्रिस मोहमद कुरेशी | रु.25555/- |
| 15 | | 14 | टेव्हर फ्रेडी मेन्डोसा | रु.23500/- |
| 16 | | 14 | परविद जुमन खान | रु.21996/- |
| 17 | | 14 | मोहमद असलम कुरेशी | रु.22786/- |

| अ.क्र. | मार्केटचे नाव | ओटा(गाळा)क्र. | निविदा धारकाचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | मासळी मार्केट व फुल मार्केट या दोन्ही मार्केट मधील पत्राशेड खालील जागा | 1 | शिल्पा विकटर मेन्डोसा | रु.30551/- |
| 2 | | 1 | नौशाद सलीम शाह | रु.16100/- |
| 3 | | 2 | खातुन इमामुद्दीन शाहा | रु.25200/- |
| 4 | | 2 | कुसुम नौशाद शाह | रु.16050/- |
| 5 | | 3 | शमिमाबानो रशिदअमद शेख | रु.26786/- |
| 6 | | 3 | जिना जिन्नी नायर | रु.24999/- |
| 7 | | 3 | अदालत सिताराम प्रसाद | रु.19250/- |
| 8 | | 4 | जिरादेवी महादेव म्हातो | रु.23051/- |
| 9 | | 4 | दिनेश भारती | रु.18500/- |
| 10 | | 4 | चंदन गणेश जैस्वाल | रु.7500/- |
| 11 | | 5 | शमा असलम खान | रु.26786/- |
| 12 | | 6 | सुशिला अल्बट गोसल | रु.12000/- |
| 13 | | 7 | संजय प्रजापती | रु.18500/- |

| अ.क्र. | मार्केटचे नाव | ओटा(गाळा)क्र. | निविदा धारकाचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | चिकन मटन मार्केट | 2 | अयेशा मोहमद रईस कुरेशी | रु.35718/- |
| 2 | | 2 | शादाब सलीम शेख | रु.33000/- |
| 3 | | 2 | इम्रान मोहमोद कुरेशी | रु.32184/- |
| 4 | | 2 | डॅनिश शफी कुरेशी | रु.31600/- |
| 5 | | 2 | अशोक मोरे | रु.22500/- |
| 6 | | 5 | मोहमोद असलम कुरेशी | रु.38555/- |
| 7 | | 5 | शबीना अलताफ कुरेशी | रु36000/- |
| 8 | | 5 | शाहरुक दिलावर खान | रु.28184/- |
| 9 | | 5 | अलबर्ट आगुश गोसाल | रु.25000/- |
| 10 | | 5 | मारीया अकलाल कुरेशी | रु.24000/- |
| 11 | | 6 | इस्माईल मोहमद शफी कुरेशी | रु.38600/- |
| 12 | | 6 | मोहमद मसकी कुरेशी | रु.36786/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | | 6 | समीर हनिफ कुरेशी | रु.35100/- |
| 14 | | 6 | राशित मकसुत चौहान | रु.32551/- |
| 15 | | 6 | पीटर जुरान डुंगा | रु.24600/- |

सदर कामी वरील तक्त्यात नमुद विक्रेत्यांनी दर सादर केलेले आहेत. सदर दर हे मा. महासभेने ठरविलेल्या दरापेक्षा जास्त असल्याने महापालिकेचा फायदा होणार आहे.

तरी सदर मंजूरीस शिफारस आहे.

(कार्यकारी अभियंता)
कार्यकारी अभियंता (मिळकत)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC-1/2021-22/SM/SG-2

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्यकार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
## ता.जि.ठाणे 401101
## समाजविकास विभाग
## सभा दि.०५/०५/2021
## // गोषवारा //

**प्रकरण क्रं.७५ :- समाजविकास विभाग सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत 06 काळजीवाहक यांना मुदवाढ देणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात शिक्षण विभागातील सर्व शिक्षा अभियान अंतर्गत विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची काळजी घेण्यासाठी एकुण 06 काळजीवाहक यांची नेमणुक करण्यात आली असुन, मा. स्थायी समिती सभा दि.29/09/2020 प्रकरण क्रं.36, ठराव क्रं.31 नुसार 03 एप्रिल 2020 ते 29 सप्टेंबर 2020 पर्यंत कार्योत्तर मंजुरी देवुन पुढे दि.28 फेब्रुवारी 2021 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. सदर मुदतवाढ दि.28 फेब्रुवारी 2021 रोजी संपुष्टात आलेली आहे.

तरी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत एकुण 06 काळजीवाहक यांना दि.02 मार्च 2021 ते 31 जानेवारी 2022 पर्यंत मुदतवाढ देणेस तसेच सदर काळजीवाहकांचे मानधन अंध व अपंग कल्याण योजनेच्या लेखाशिर्षातुन करणेबाबतचा विषय आर्थिक व प्रशासकीय मंजुरीकरीता मा. स्थायी समिती सभेसमोर ठेवण्यास मंजुरीस्तव् शिफारस आहे.

(संभाजी पानपट्टे)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## पाणी पुरवठा विभाग
### मा. स्थायी समिती सभा दि.०५/०५/2021

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( १६ ) :- विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग)**

**उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.**

**1) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सेक्टर नं 03 मिरारोड, येथील ड्रेनेज पंपगृहात नवीन स्टँड बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वित करणे, तसेच केंद्रीकृत रिमोट मॉनिटरींग आणि VDF आधारित ऑटोमेशन सिस्टम लावणे. (अंदाजित रक्कम रु. 62,00,000/-) (Tender Id :- 646920_1)**

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **1) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** | **अंदाजपत्रक दरापेक्षा 1.00% कमी दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 2.00% कमी दर** |
| 2) मे. माना इलेक्ट्रिक ॲन्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस | अंदाजपत्रक दरापेक्षा 6.00% जास्त दर |

**2) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सेक्टर नं 08 मिरारोड, येथील ड्रेनेज पंपगृहात नवीन स्टँड बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वित करणे, तसेच केंद्रीकृत रिमोट मॉनिटरींग आणि VDF आधारित ऑटोमेशन सिस्टम लावणे. (अंदाजित रक्कम रु.54,00,000/-) (Tender Id :- 646939_1)**

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **1) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** | **अंदाजपत्रक दरापेक्षा 1.00% कमी दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 2.00% कमी दर** |
| 2) मे. माना इलेक्ट्रिक ॲन्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस | अंदाजपत्रक दरापेक्षा 5.00% जास्त दर |

**3) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या जेसल पार्क येथील ड्रेनेज पंपगृहात नवीन स्टँड बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वित करणे, तसेच केंद्रीकृत रिमोट मॉनिटरींग आणि VDF आधारित ऑटोमेशन सिस्टम लावणे. (अंदाजित रक्कम रु.36,00,000/-) (Tender Id :- 646950_1)**

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **1) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** | **अंदाजपत्रक दरापेक्षा 1.00% कमी दर वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दरापेक्षा 2.00% कमी दर** |
| 2) मे. माना इलेक्ट्रिक ॲन्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस | अंदाजपत्रक दरापेक्षा 4.00% जास्त दर |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र.1, 2 व 3 च्या कामांकरीता **मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 (क) नुसार मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने)**

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

**मा. स्थायी समिती सभा दि. ०५/ ०५ /2021**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ( १८ ) :- निविदेस मान्यता देणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारत व प्रभाग कार्यालय इमारतीमध्ये दैनंदिन साफसफाई करीता House Keeping एजन्सी नेमणे. (अंदाजित खर्च रु.२,२५,००,०००/- टेंडर आयडी क्र. 632308_1 या कामी प्राप्त झालेल्या कंत्राटदारांचा दराचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**Cleaning and disposal of manpower in toilets, materials, materials etc. Bucket, Broom, hand glows, masks, Shoes, deodorant, acids, phenyl, uniform, soap, cleaning and keeping daily for toilet use and daily circulation of toiletries. Admission Charges, Equipment, Uniform, Sweeping Material, Safety measures 20%**

| Sr. No. | Contractor Name | Supervisor | | Housekeeper (Male & Female) | | Total | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 7.00 am to 3.00 pm | 10:00 am to 7.00 pm | 7.00 am to 3.00 pm | 10:00 am to 7.00 pm | | |
| 1 | मे. शाईन मेंनटेन्स सर्व्हीसेस | 900 | 900 | 792 | 792 | 3384 | अपात्र |
| 2 | मे. आर्क इन्फोसॉफ्ट प्रा.लि., | 1005<br>दरवाटाघाटीनंतर<br>972 | 1005<br>दरवाटाघाटीनंतर<br>972 | 905<br>दरवाटाघाटीनंतर<br>905 | 905<br>दरवाटाघाटीनंतर<br>905 | 3820<br>दरवाटाघाटीनंतर<br>3752 | L-1 |
| 3 | मे. यु.आर. फॅसिलिटी सर्व्हीसेस | 973 | 973 | 960 | 960 | 3867 | |
| 4 | मे. समर्थ बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, | 1036 | 1036 | 913 | 913 | 3898 | |
| 5 | मे. बरकत्त कॉन्ट्रक्टर्स | 1039.95 | 1039.95 | 918.99 | 918.99 | 3917.88 | |
| 6 | मे. विजन इंटरप्रायझेस | 1048 | 1048 | 927 | 927 | 3950 | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | मे. सुपर फॅसिलिटी सर्व्हीसेस प्रा.लि., | 1125 | 1125 | 925 | 925 | 4100 | |
| 8 | मे.गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | 1094 | 1094 | 964 | 964 | 4116 | |
| 9 | मे. श्री स्वामी समर्थ सिक्युरिटी ॲण्ड हॉस्पीलिटी प्रा.लि., | 1079 | 1079 | 1012.68 | 1012.68 | 4183.36 | |
| 10 | मे. ओरियन्टल इंटिग्रेटेड फॅसिलिटी मॅनेजमेंट प्रा.लि., | 1131 | 1131 | 999 | 999 | 4260 | |
| 11 | मे. सिटीझन अलाईड सर्व्हीसेस, | 1196 | 1196 | 1056 | 1056 | 4504 | |
| 12 | मे. द बेस्ट इंटरप्रायझेस, | 1196 | 1196 | 1056 | 1056 | 4504 | |
| 13 | मे. मानव सेवा बहुउद्देशिय बेरोजगार सहकारी संस्था, | 1196 | 1196 | 1056 | 1056 | 4504 | |
| 14 | मे. एन.पी.एस फॅसिलीटी, | 1197 | 1197 | 1062 | 1062 | 4518 | |
| 15 | मे. शार्प सर्व्हीसेस, | 25357 | 28527 | 22387 | 25185 | 101456 | |
| 16 | मे. श्री राम इंटरप्रायझेस, | 26745 | 26745 | 24003 | 24003 | 101496 | |
| 17 | मे. पी.एन.एस अपकीप सर्व्हीसेस प्रा.लि., | 32964 | 32964 | 29099 | 29099 | 124126 | |
| 18 | मे. ए.सी.ई ग्लोबल सोल्युशन प्रा.लि., | 744785 | 372393 | 11161492 | 5231950 | 17510620 | |

१) सदर कामाकरीता वरीलप्रमाणे दर प्राप्त झाले असुन निविदा अटीशर्ती व शासन निणर्यानुसार किमान वेतनापेक्षा दर कमी भरल्यास सदर निविदाधारकांची निविदा विचारात घेण्यात येऊ नये असे नमुद केले आहे. त्यानुसार मे. शाईन मेंनटेन्रस सर्व्हीसेस त्याची निविदा अपात्र ठरत आहे.

२) किमान वेतन कायदयानुसार सुपरवायझर करीता प्रति दिन रु.८७९.५७/- व हाऊस किंपीग (लेबर) करीता प्रति दिन रु.८०४.५७/- इतका दर आहे.

३) त्यानुसार मे. आर्के इन्फोसॉफ्ट प्रा.लि., यांनी दरवाटाघाटीनंतर सुपरवायझर करीता प्रति दिन (८ तासांकरीता) रु.९७२/- व हाऊसकिंपींग कर्मचारी करीता प्रति दिन (८ तासांकरीता) रु.९०५/- असा दर सादर केला आहे.

४) त्यानुसार किमान वेतन दर व दरवाटाघाटीनंतर सादर केलेल्या दरामधील असलेल्या दराच्या तफावतीमध्ये निविदेमध्ये नमुद केल्याप्रमाणे साफसफाई करीता लागणारे साहित्य, युनिफार्म व प्रशासकिय शुल्क इ. खर्च समाविष्ट आहे. त्यानुसार मे. आर्क इन्फोसॉफ्ट प्रा.लि., यांनी दरवाटाघाटीनंतर सादर केलेले दर हे वाजवी असुन सदरच्या दरास जी.एस.टी रकमेसह मान्यता देण्यास शिफारस आहे.

**कार्यकारी अभियंता (सा.बां)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.०५/ ०५ /2021

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ( १९ ) :- मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या निविदांचे अवलोकन करणे.**
**(पाणी पुरवठा विभाग)**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रु.) | कंत्राटदाराचे नाव | मंजूर निविदा रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1. | भाईदर (पुर्व) नवघर येथील गावदेवी चाळ ते सदगुरु कृपा इमारती पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.9,54,700/- | मे. विंध्या ट्रेडर्स | रु.9,54,700/- |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चेना व उत्तन जलकुंभावरील 400 मि.मी. व्यासाच्या, मिरा व अस्मिता जलकुंभावरील 350 मि.मी. व्यासाच्या व मोर्वा जलकुंभावरील 250 मि.मी. व्यासाच्या पाईपलाईनवर इलेक्ट्रोमॅगनेटीक फ्लो मिटर पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे. | रु.22,26,049/- | मे. एस.एम.पॉलीमर्स | रु.21,14,747/- |
| 3. | सृष्टी मलनि: स्सारण केंद्र येथे संरक्षक भिंत बांधणे. | रु.6,91,000/- | मे. व्हि. के. इंटरप्रायजेस | रु.6,21,209/- |

वरील निविदांना मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने**

D:\E DRIVE DATA\Rane\Goshwara\2021-22\Avalokan tharav kame -Dt.16-04-2021.doc

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**मा. स्थायी समिती सभा दि.** 05 / 05 /2021

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.:- (** २० **)** मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नाव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| 1 | २ | ३ | ४ | ५ |
| 1. | रा.म.क्र. ०८ प्रभाग क्र. १४ वैष्णोदेवी मंदिरा शेजारील कम्युनिटी हॉल येथे दुरुस्ती, रंगकाम व कुंपणभिंत बांधणे. (महापौर स्वेच्छा निर्णय निधी) | रु.१७,०६,२२०/- | मे. राठोड ब्रदर्स | १.०० % कमी दराने |
| 2. | रा.म.क्र. ०८ प्रभाग क्र. १४ मधील जनतानगर (जे-२ पॅकेज) मधील अंतर्गत पायवाटा आणि गटारे दुरुस्त करणे. (महापौर स्वेच्छा निर्णय निधी) | रु.१७,९७,१३८/- | मे. राठोड ब्रदर्स | १.०० % कमी दराने |
| 3. | मिरारोड (पुर्व) पुनमसागर ख्रिश्चन दफनभूमी मध्ये विविध कामे करणे आणि कमान बांधणे. (महापौर स्वेच्छा निर्णय निधी) | रु.८,८८,८६३/- | मे. राठोड ब्रदर्स | १.०० % कमी दराने |
| 4. | रा.म.क्र. ०८ प्रभाग क्र. १४ मधील मिनाक्षी नगर साईधाम चाळ समोरील नाल्यावरील कल्वर्ट रुंदीकरण करणे. (महापौर स्वेच्छा निर्णय निधी) | रु.२२,०१,६२३/- | मे. राठोड ब्रदर्स | १.०० % कमी दराने |
| 5. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.२१ मधील शहीद मेजर कौस्तुभ राणे जॉगर्स पार्क मध्ये कर्टन फाऊंटन (Curtain Fountain) आणि वॉल गार्डन तयार करणे. (नगरसेवक निधी) | रु.१३,३२,७०८/- | मे. श्री गणेश इंटरप्रायझेस | १.०० % कमी दराने |
| 6. | मिरारोड (पुर्व) घोडबंदर येथील साईनाथ सेवा नगर येथे सी.सी. रस्ते व नाली बनवणे. (नगरसेवक निधी) | रु.१३,३०,११७/- | मे. एम.एस. इंटरप्रायझेस | १.१० % कमी दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. ०८ मधील जे.पी.ठाकुर रस्त्यालगत अमृतवाणी सस्तंग रस्ता ते आकांक्षा इमारत येथील गटाराची पुर्नःबांधणी करणे. (नगरसेवक निधी) | रु.८,९१,०४४/- | मे. श्री लक्ष्मी कंस्ट्रक्शन | १.०० % कमी दराने |
| 8. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. ०८ मधील जे.पी.ठाकुर रस्त्यालगत श्री राम सरोवर ते न्यु झिल इमारत पर्यंत गटाराची पुर्नःबांधणी करणे. (नगरसेवक निधी) | रु.८,६६,४२८/- | मे. श्री लक्ष्मी कंस्ट्रक्शन | १.०० % कमी दराने |
| 9. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. ०८ मधील जे.पी.ठाकुर रस्त्यालगत न्यु झिल इमारत ते मोहन शंकर कुटीर गटाराची पुर्नःबांधणी करणे. (नगरसेवक निधी) | रु.५,९७,४४८/- | मे. श्री लक्ष्मी कंस्ट्रक्शन | १.०० % कमी दराने |
| 10. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. ०८ मधील किशनलाल स्मृती इमारतीपासुन रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरण करणे. (नगरसेवक निधी) | रु.१३,३५,६९७/- | मे. महेश सुरेश चाटे | १.०० % कमी दराने |
| 11. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २३ मधील मुर्धा स्मशानभुमी येथे लाकडासाठी गोडाऊन बांधणे, कॉक्रीटीकरण करणे व इतर कामे करणे. (नगरसेवक निधी) | रु.७,८१,०२७/- | मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | १.०० % कमी दराने |
| 12. | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २३ मधील राई कार्यालयाचे नुतनीकरण करणे. (नगरसेवक निधी) | रु.१३,३१,७७२/- | मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | १.०० % कमी दराने |
| 13. | रा.म.क्र.८ प्रभाग समिती क्र.१४ मधील साई कॉम्पलेक्स, शैलेश बिल्डींगजवळ, उघडया गटारावर स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी) | रु.६,१९,५५६/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | १.३९ % कमी दराने |
| 14. | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.१६ पेणकरपाडा येथील वर्तक गल्ली पायऱ्या व गटाराची दुरुस्ती करणे. (नगरसेवक निधी) | रु.७,५७,६१२/- | मे. एकता कंस्ट्रक्शन | १.०० % कमी दराने |
| 15. | मिरारोड (पुर्व) सिल्व्हर पार्क शिवसेना शाखेसमोर डिव्हायडर स्टॅच्यु लावुन सुशोभिकरण करणे. (नगरसेवक निधी) | रु.८,८२,०१७/- | मे. अतुल संजय साळवी | १.०० % कमी दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 16. | रा.म.क्र.८ प्रभाग समिती क्र.१४ मधील मिरा-गावठण, महाजनवाडी येथील नित्यानंद शाळेसमोर उदयान आरक्षण क्र.३७० च्या मागील बाजुस पत्राशेडचे समाजमंदिर बांधणे. (नगरसेवक निधी) | रु.१३,३१,६८६/- | मे. निलेश रणदिवे | १.०० % कमी दराने |
| 17. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.०५ मध्ये रावल नगर येथे शालीभद्र ते नर्मदा कुंज इमारती पर्यंत सी. सी. रस्ता बनवणे. (नगरसेवक निधी) | रु.१३,११,४१६ /- | मे. एम.एस. इंटरप्रायझेस | १.१० % कमी दराने |
| 18. | भाईंदर (पुर्व) प्रभग क्र.०५ मध्ये सावित्री सदन ते चंद्रा स्मृती येथे गटार रस्त्याच्या समांतर करणे. (नगरसेवक निधी) | रु.१०,७४,११८/- | मे. दुर्गेश कंस्ट्रक्शन | १.१० % कमी दराने |
| 19. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.११ मध्ये नवघर येथे श्री. समर्थ कृपा बंगला ते सोलंकी अपार्टमेंट पर्यंत सी.सी. रस्ता बनविणे. (नगरसेवक निधी) | रु.१२,७४,२३४/- | मे. तिरुपती बालाजी इंटरप्रायझेस | १.१० % कमी दराने |
| 20. | भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.०३ मध्ये विविध ठिकाणी दिशा दर्शक बोर्ड लावणे. (नगरसेवक निधी) | रु.१३,३१,०००/- | मे. विराज इंटरप्रायझेस | १.१० % कमी दराने |
| 21. | भाईदर (पुर्व) प्रभाग क्र.०४ मध्ये सिध्दीविनायक हॉस्पीटल गल्लीमध्ये अंबिका पॅलेस ते मानसी मेटल इमारतीपर्यंत सी. सी. रस्ता बनविणे. (नगरसेवक निधी) | रु. ९,३१,०४८/- | मे. प्रथम इंटरप्रायझेस | १.०० % कमी दराने |
| 22. | भाईदर (पुर्व) प्रभाग क्र.०४ मध्ये नवघर पोलिस स्टेशन बाहेरील भिंत सुशोभिकरण करणे. (नगरसेवक निधी) | रु.१२,५३,४४६/- | मे. अतुल संजय साळवी | १.०० % कमी दराने |
| 23. | भाईदर (पुर्व) प्रभाग क्र.१० येथील गोल्डन नेस्ट सर्कल, आझद नगर शौचालयालगत मोकळया जागेत सुशोभिकरण करणे. (नगरसेवक निधी) | रु. ९,१२,५६१/- | मे. शोभा इंटरप्रायझेस | १.०० % कमी दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 24. | रा.म.क्र.८ प्रभाग क्र.१४ काशिमिरा येथील ग्रीन व्हिलेज समोरील चौकाचे सुशोभिकरण करणे. (नगरसेवक निधी) | रु.१२,३९,६५३/- | मे. राठोड ब्रदर्स | १.०० % कमी दराने |

वरील निविदांना मा. आयुक्त यांनी जी.एस.टी. सह मंजूरी दिली आहे. सदर कामे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत.

**कार्यकारी अभियंता (सा.बां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC8/20-21/DK/SG-11

गोषवारा प्राप्त दि. २८/०१/२०२१ ११.२१.४५
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ....०८..... वर्ष : २०२१/२२

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका